अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १२ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८





## आ. सातपुते यांचा वाढदिवस साजरा

**सुराज्य/खंडाळी** : खंडाळी व दत्तनगर येथे माळशिरस तालुक्याचे आमदार रामभाऊ सातपुते यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाऊसाहेब राऊत विद्या मंदिर दत्तनगर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळी येथे विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या विचारांच्या पुस्तकाचे वाटप व खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हस्ते आमदारांच्या वाढदिवसाचा केक कापण्यात आला.

यावेळी माजी सरपंच बाबुराव पताळे, भाजपचे तालुका सरचिटणीस विनोद थिटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंद चव्हाण, शहाजी पताळे, विजय रास्ते, अमोल पिंपळे, नाना वारुळे, मनोज थिटे, प्रसाद काळे, देवा कांबळे, आनंद जगताप, मुख्याध्यापक सरगर, साठे सर, मुख्याध्यापिका महाजन, पोळ, हिंगमिरे, चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन श्रीदत्त बहुउद्देशीय संस्था दत्तनगर व भारतीय जनता युवा मोर्चा दत्तनगर-खंडाळी यांच्यावतीने करण्यात आले होते. सूत्रसंचालन बिराजदार यांनी केले व आभार प्रथमेश वारुळे यांनी मानले.

### स्वामी समर्थ कारखाना निवडणूक

# सिद्रामप्पा पाटलांसह १० उमेदवारांचे अर्ज दाखल

**सुराज्य/अक्कलकोट**

**अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे येथील स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शुक्रवार पहिल्या दिवशी माजी आमदार व अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील गटाकडून अप्पासाहेब पाटील, बसलिंगप्पा खेडगी, सिद्रामप्पा पाटील, सिध्दप्पा गड्डी, बाबुशा करपे, स्वामीराव पाटील, संजीव अंबाजी पाटील, श्रीमंत कुंटोजी, शरणप्पा मंगाणे, संजीव सिद्रामप्पा पाटील या १० जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.**

गेल्या ८ वर्षापासून बंद असलेला साखर कारखाना सुरु करण्यासाठी सर्व ती तयारी करण्यात आली. कार्यक्षेत्रातील ऊसाचे क्षेत्र पाहता न परवडणारे असल्याने आगामी गळीत हंगामाकरिता सज्ज करण्यात आला आणि अवघ्या काही महिन्यातच कारखान्याची निवडणूक लागली आहे. सिद्रामप्पा पाटील यांचे सन १९९९ पासून स्वामी समर्थ साखर कारखान्यावर वर्चस्व आहे. सहकार क्षेत्रात गेल्या ५० वर्षापासून पाटील हे कार्यरत आहेत. वयाची तमा न बाळगता आजही कारखान्याच्या निवडणुकीत युवकाप्रमाणे धावपळ सुरु आहे. या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी हे



आप्पांच्याच बाजूने असल्याने पाटील गटाचे पारडे जड आहे. सदरची निवडणूक बिनविरोध व्हावी अशी मागणी तमाम शेतकरी सभासदातून होत आहे.

कारखान्याची सभासद संख्या २० हजार ५५५ इतकी असून एकूण २१ संचालक असणार आहेत. यामध्ये सहकारी संस्था मतदार संघातून १, ऊस उत्पादक मतदारसंघातून १५, अनुसूचित जाती-जमाती १, भटक्या विमुक्त जाती १, महिला राखीव २, विशेष मागासवर्गीय १ असे संचालक मंडळ असणार आहेत. उमेदवारी दाखल करण्यासाठी शेवटची मुदत दि.१६ मार्चपर्यंत राहणार असून अवघ्या चार दिवसात निवडणूक लागणार की अविरोध होणार याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड हे काम पाहत आहेत. निवडणूक अक्कलकोटच्या स्वामी समर्थ कारखान्याची निवडणूक प्रक्रिया सोलापुरातील जिल्हा उपनिबंधक यांच्या कार्यालयातून आखली जाणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शेतकरी सभासदांना सोलापुरात जावे लागणार आहे. जिल्हा उपनिबंधक यांच्यावर सहकार खात्याची वाढलेली जबाबदारी पाहता सदरची निवडणूक प्रक्रिया ही सोलापूर येथे ठेवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

#### यांनी दाखल केले अर्ज

पहिल्या दिवशी ऊस उत्पादक गट - अक्कलकोट गटातून विद्यमान संचालक व बाजार समितीचे माजी उपसभापती अप्पासाहेब पाटील (चपळगाव), साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी (अक्कलकोट), सुलेर जवळगे गटातून - विद्यमान अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील (कुमठे), सिध्दप्पा गड्डी (शेगाव), बाबुशा करपे (पानमंगरुळ), वागदरी गट - स्वामीराव पाटील (कुरनूर), संजीव अंबाजीप्पा पाटील (चुंगी), श्रीमंत कुंटोजी (भुरिकवठे), शरणप्पा मंगाणे (वागदरी), सोसायटी मतदारसंघातून संजीवकुमार सिद्रामप्पा पाटील अशा दहा जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.



## जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी स्वाक्षरी मोहिम

**सुराज्य/अक्कलकोट** : येथील प्रमिलापार्क, लक्ष्मी निवास येथे महात्मा फुले सत्यशोधक स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय सत्यशोधक ओबीसी फेडरेशन आयोजित जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे या मागणीसाठी ओबीसी समाज बांधवाचा एकदिवसीय जनजागरण कार्यशाळा ओबीसीचे समाजाचे जेष्ठ नेते शंकरराव लिंगे यांच्या मार्गदर्शनखाली पार पडली. यावेळी अक्कलकोट काँग्रेसचे महिला तालुकाध्यक्षा शितल म्हेत्रे अध्यक्षस्थानी होते तर सभापती प्रथमेश म्हेत्रे प्रमुख उपस्थितीत होते. याप्रसंगी शहर काँग्रेस अध्यक्ष बसवराज अल्लोळी, युवक काँग्रेस शहर अध्यक्ष मुबारक कोरबु, अय्याज चंदनवाले, जब्बार बागवान, बबन पवार, राहुल भकरे, नितीश राठोड, महादेव चुंगी, विकी कोरेसह आदी उपस्थित होते.



## 'रामवाडी'च्या पवारांची झेडपीकडे पदोन्नती

### डॉ. राहुल खांडेकर यांच्याकडे पदभार

**सुराज्य/सोलापूर** : **महापालिकेच्या रामवाडी येथील नागरी आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. स्वरांजली पवार यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पदोन्नती करत जि. प. कडे समावेश करण्यात आला. रामवाडीचा पदभार डॉ. राहूल खांडेकर यांच्याकडे दिला आहे.**

पवार यांनी रामवाडी दवाखान्यालाच नव्हे तर रुग्णांच्या मनातील श्रद्धास्थान निर्माण केले होते. दोन वर्षे कार्यभार सांभाळला. या दरम्यान त्यांनी अनेकांना जीवदान दिले. त्यानिमित्ताने पवार यांना निरोप देऊन पदमुक्त केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ., जयंती आडके, डॉ. शिल्पा शेटे, डॉ. लता रणखांबे, राष्ट्रवादी गटनेते किसन जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक रेखा गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन पूनम जाधव व सोनाली कारंडे यांनी केले. किसन जाधव यांनी डॉ. स्वरांजली पवार यांचा सत्कार केला यावेळी यास्मिन पठाण, दिपाली खंबाळे, विजया जमादार, वनमाला शिंदे, विजया कांबळे, सरिता लोखंडे, प्रियंका राठोड, पूजा राठोड, स्वप्नाली मोरे, स्वाती कोळी, वैशाली वाघ, जाई जाधव, उषा कार्यकर, पल्लवी भुसेकर, सत्यभामा शिवशरण, रेश्मा शेख, कुमार जाधव, धनराज संदोलकर, महादेव राठोड, वसंत कांबळे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## गुरव समाजाकडून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

**सुराज्य/सोलापूर**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काशीबा महाराज गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून चालू बजेटमध्ये पन्नास कोटी रुपये निधी आर्थिक विकास महामंडळाला देऊन बजेटमध्ये मान्यता घेण्यात दिल्याने त्यांचे गुरव समाजाने राष्ट्रीय अध्यक्ष विजय शिंदे आणि राष्ट्रीय महासचिव मल्लिकार्जुन यांनी अभिनंदन केले.**

गुरव समाज महासंघाच्यावतीने घेण्यात आलेल्या महा अधिवेशनाच्या वेळी केलेल्या मागणीला यश आले आहे. हा ऐतिहासिक निर्णय अधिवेशनामध्ये घेतले आहे.





कमी काळात म्हणजे तीन महिन्यातच योगदान या सरकारने समाजाला दिलेला आहे. आज महाराष्ट्र पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. संत काशीबा महाराज गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून चालू बजेटमध्ये पन्नास कोटी रुपये निधी आर्थिक विकास महामंडळाला देऊन बजेटमध्ये मान्यता घेण्यात आली. महाराष्ट्र सरकारला गुरव समाजाची ताकत एकजुटी दाखविले त्याची दखल घेतली. या महामंडळाच्या माध्यमातून गुरव समाजातील युवकासाठी युतीसाठी अनेक योजना या आर्थिक विकास महामंडळातून मिळणार आहे. अशाच पद्धतीने संघटना बाजूला ठेवून समाजासाठी एकत्र येणे अतिशय महत्त्वाचा आहे सर्व पदाधिकारी व राष्ट्रीय गृह समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष विजयराव शिंदे यांनी प्रयत्न केल्याबद्दल गुरव यांनी त्यांच्यासह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.



## 'एसपीएम'मध्ये महिला दिन साजरा

**सुराज्य/सोलापूर** : महिला दिनाचे औचित्य साधून एस. पी. एम. पॉलिटेक्निक कुमठे येथे विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान तसेच हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुजाता कुलकर्णी, स्त्रीरोगतज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. अंजली जम्मा, डॉ. नंदा मगाई यांनी नियमितपणे व्यायाम व स्वच्छता याकडे लक्ष दिले पाहिजे असे सांगितले.

या कार्यक्रमात २२९ विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. प्रास्ताविक प्राचार्या रोहिणी चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. स्वाती पाटील यांनी केले पाहुण्यांची ओळख प्रा. ज्योती पतंगे यांनी करून दिली कार्यक्रमासाठी प्रा. गिरीजा दीक्षित, प्रा. सविता म्हेत्रे, प्रा. अंकिता इंडे, प्रा. सुप्रिया जाधव, प्रा. स्नेहल गायकवाड, प्रा. प्रीती गरड, प्रा. सना शेख, प्रा. श्रीदेवी नंदी, प्रा. राजमाने यांनी परिश्रम घेतले.

## ...तरच समाज पुढे जाईल : जिल्हाधिकारी

**सुराज्य/सोलापूर**

**समाजातील महिलांची संख्या जवळपास ५० टक्के आहे. त्यामुळे त्यांना समाजात मानाचे, हक्काचे स्थान दिले तरच समाज पुढे जाईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी व्यक्त केले.**

नियोजन भवन सभागृहात महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार , जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार अंजली मरोड, अंजली कुलकर्णी, प्रमुख व्याख्यात्या ज्योती वाघमारे, सुधा अळ्ळीमोरे, उद्योजिका अनिता माळगे, जलतरणपटू कीर्ती भराडिया यांच्यासह जिल्हाधिकारी विविध विभागांच्या अधिकारी, कर्मचारी सहकुटुंब उपस्थित होते.

महिलांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. त्याचा लाभ त्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यावेळी प्रमुख व्याख्यात्यांनी जीवन 'जगण्याची कला' या विषयावर मार्गदर्शन केले. ज्योती वाघमारे यांनी उदाहरण महिलांना त्यांची बलस्थानांविषयी तसेच सुधा अळ्ळीमोरे, शमा पवार यांनीही मार्गदर्शन केले. अनिता माळगे, कीर्ती भराडिया यांनी अनुभवांसह मनोगत व्यक्त करून संधी मिळाली तर तिचे नक्की सोने करा, असे सांगितले.

## भागिरथसिंह चौहान यांचे निधन

**सुराज्य/सोलापूर** : प्रभाग क्रमांक २, दहिटणे येथील रहिवासी भागिरथसिंह बलदेवसिंह चौहान यांचे शुक्रवारी निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. ते सोलापूर महानगरपालिकेत पाणीपुरवठा विभागात कार्यरत होते. दहिटणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले.



## जि.प.पदाधिकाऱ्यांना ४ कोटींचे मिळणार मानधन?

### अध्यक्ष, सभापतींच्या इंधनासाठी २६ लाखांची तरतूद

**सुराज्य/सोलापूर**

**नियोजित झेडपी पदाधिकाऱ्यांसाठी सन २०२३-२४ च्या अर्थिक अंदाजपत्रकात ४ कोटीपर्यंतचे वार्षिक मानधन देण्याचे नियोजन सामान्य प्रशासनाकडून होत आहे. सद्यस्थितीत पदाधिकारी नसतानाही झेडपीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह सभापतींच्या वाहन इंधनासाठ तब्बल २६ लाखांची तरतूद सुचविण्यात आली आहे.**

सहभागृहात सादर होणार आहे. पदाधिकाऱ्यांच्या वाहन दुरुस्तीत मागील वर्षाच्या तुलनेत ४५ लाखांची कपात करण्यात आली आहे दुरुस्तीसाठी ३ लाख १० हजारांचा निधी राखीव ठेवण्यात ठेवण्यलत आल्याचे सांगण्यात आले. झेडपीच्या पदाधिकाऱ्यांची मुदत मार्च २०२२ अखेर संपली. त्यामुळे सध्या झेडपीत प्रशासकिय राजवट कार्यरत असून पदाधिकारी, सदस्य सद्यस्थितीत

सर्वसाधारण सभेसाठी ७ लाख ५० हजार तर पंचायत समिती स्तरावर ३ लाख ५० हजारांचा निधी देण्यात आला आहे. महिला बालकल्याण ३ कोटी ९० लाख, कृषी ४ कोटी, पशूसंवर्धन ४ कोटी, समाजकल्याण २ कोटी ५० लाख आरोग्य ४ कोटी ग्रामपंचायात ३५ लाख, बांधकाम विभाग कोटी ५० लाख, प्राथमिक शिक्षण ६ कोटी ५० लाख अर्थ विभाग ५० लाख लघु तरतूद सुचवण्यात आली आहे. सद्यस्थितीत झेडपीत पदाधिकारी व सदस्या नाहीत. तरीही आगामी काळात निवडणुका पद होऊ शकतात, हे गृहीत धरून त्या पद्धतीने अंदाजपत्रक सोमवारी सभागृहात सादर होणार आहे.



पत्रकात राखीव तरतुद करण्यात आली आहे.

सन २०२० ते २२ सालातील पदाधिकारी सदस्यांच्या जिल्हा फिरता दौऱ्याचा खर्चाचा तपशील आयपर्यंत प्रशासनाला प्राप्त झाला. अंदाजपत्रक तयार करण्याबाबत लेखा विभागाला सूचना केली आहे. त्याप्रमाणे माहिती घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. पदाधिकारी व सदस्य अस्तित्वात नसले तरी भविष्यातील गरज लक्षात गरजेचे आहे. यासाठी अध्यक्ष उपाध्यक्ष, पंचायात समिती सभापती उपसभापती ४ लाख ७० हजारांची तरतूद करण्यात आली होती. तर झेडपी आणि पंचायत समिती सदस्यांसाठी ४० लाख १० हजारांची तरतूद करण्यात आली होती. यंदाही या अर्थसंकल्पात ही तरतूद कायम झेडपीच्या नियोजित तरतुदीत राहणार का बदल होणार याकडे सर्वांचे नजर लागून राहिले आहेत.




## प्रिसिजन कंपनीमध्ये सुरक्षा सप्ताह साजरा

**सुराज्य/सोलापूर**

**प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड कंपनीमध्ये ५२ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला त्यावेळी कंपनीमधील सर्व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा शपथ घेतली.**

रस्ता सुरक्षा, काम करत असताना वैयक्तिक घ्यायची काळजी, स्वतः नियमांचे पालन केले तरच शून्य अपघाताचे ध्येय गाठता येईल. यातूनच कंपनीमधील वातावरण अधिक सुरक्षित राहील. आरोग्य, पर्यावरण तसेच वैयक्तिक सुरक्षा साधने यांच्या वापराचे महत्व याची माहिती कर्मचाऱ्यांना कंपनीचे सुरक्षा व्यवस्थापक सुहास पाटील यांनी दिली. सुरक्षाविषयक माहिती व सुरक्षा साप्ताहबद्दल अमित पाटील यांनी कर्मचाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर एचआर विभागाचे सरव्यवस्थापक राजकुमार काशीद यांनी मार्गदर्शन केले.

आमचे ध्येय, शून्य अपघात ही यावर्षीची सुरक्षा सप्ताहाची थीम आहे. या थीमला अनुसरून संपूर्ण सप्ताहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास कंपनीतील सर्व अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी सुरक्षा रक्षक उपस्थित होते.

# ३४ रस्त्यांसाठी ७५ कोटींचा निधी

### आ. कल्याणशेट्टी यांची माहिती

**सुराज्य/अक्कलकोट**

**अक्कलकोट विधानसभा क्षेत्रासाठीच्या ३४ अत्यावश्यक रस्त्यांच्या सुधारणा करण्यासाठी चालू अर्थसंकल्पात ७५ कोटी निधी तरतूद होऊन मिळाल्याची माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.**

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांची बिकट अवस्था हि गेल्या अनेक वर्षांपासून आहे तसेच होती. अनेक निवडणुका या जिव्हाळ्याच्या रस्त्याच्या प्रश्नावरच लढल्या गेल्या होत्या. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी कोरोना काल वगळता केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून विविध योजनेमधून मतदार संघातील अनेक रस्ते प्रश्न मार्गी लावण्यात आली आहेत. आता यावेळच्या अर्थसंकल्पात अनेक रस्त्याच्या सुधारणेची कामे मार्गी लावण्यासाठी सतत पाठपुरावा करून एकूण ३४ ग्रामीण भागातील महत्वाच्या रस्त्यांसाठी निधीची तरतूद करण्यात यश आले असून एकूण ७ ५ कोटी एवढा मोठा निधी मिळाला आहे.



यावेळी झालेली मंजूर कामे रक्कम रुपये पुढीलप्रमाणे आहेत.

हैद्राबाद रोड ते मुळेगाव रस्ता प्रजिमा-४३ साठी ३ कोटी, दर्गनहळ्ळी-धोत्री रस्ता प्रजिमा- ४३ साठी ६ कोटी, दोड्डी ते दर्गनहळ्ळी रस्ता प्रजिमा- ४३ करिता २.५० कोटी, मुंढेवाडी ते कोर्सेगाव २ कोटी, केगांव बु. ते कोर्सेगाव २.५० कोटी, मुंढेवाडी ते अंकलगी रस्ता ३.५० कोटी,किणी ते काझीकणबस ते जिल्हा हद्द रस्ता ३ कोटी, बोरेगाव ते दर्शनाळ रस्ता ३.५ कोटी, तोरणी ते मैंदर्गी रस्ता ३ कोटी, बोरोटी ते बबलाद रस्ता ३ कोटी, धोत्री ते संगदरी रस्ता ४.५ कोटी, तुळजापूर रोड ते कासेगाव रस्ता ३ कोटी, वडजी ते खडगी जिल्हा हद्द रस्ता ३ कोटी, सातनदुधनी ते बोरोटी रस्ता २ कोटी, कुडल ते म्हैसलगी ५ कोटी, किरनळ्ळी ते घोळसगाव रस्ता ३ कोटी, कुमठे ते केगाव ग्रा.मा. ९२ रस्ता करण् १ कोटी ४० लाख,कुमठे ते संजवाड रस्ता १कोटी, गुड्डेवाडी ते तडवळ फाटा रस्ता ८० लाख, हिळ्ळी ते आंदेवाडी बु. ते कुडल रस्ता २ कोटी, अक्कलकोट ते बणजगोळ रस्ता ७० लाख, हत्तीकणबस ते मिरजगी रस्ता ८० लाख, उडगी ते मैंदर्गी रस्ता १ कोटी ९० लाख, मैंदर्गी ते भोसगा रस्ता २ कोटी, बबलाद ते आंदेवाडी १ कोटी, तोळणूर ते भिंगोळी कर्नाटक हद्द रस्ता ८० लाख, हंजगी ते बागेहळ्ळी ते अक्कलकोट रस्ता ३ कोटी, बोरोटी स्टेशन ते तळेवाड रस्ता १ कोटी, किणीवाडी ते पालापूर रस्ता १ कोटी ४० लाख, किणीवाडी ते सिंदगाव रस्ता १ कोटी ४० लाख, होटगी ते शिंगडगाव रस्ता १कोटी, लिंबीचिंचोळी ते दिंडूर रस्ता १ कोटी, बादोला ते कुरनूर रस्ता ८० लाख, बागेहळ्ळी ते सोलापूर रस्ता करणे ५० लाख रुपये याप्रमाणे निधी मंजूर झाला आहे.




## शिवसेनेकडून महिला सफाई कामगारांचा सन्मान

**सुराज्य/माढा**

जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने माढा नगरपंचायतच्या महिला सफाई कामगारांना शिवसेनेच्यावतीने जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी आर्थिक मदतीचा हात देऊन त्यांचा साडी, चोळी देऊन सन्मान केला. माढ्यातील शिवसेना कार्यालयात सावंत यांनी महिला सफाई कामगारांच्या त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यामध्ये माया गायकवाड, सीमा पवार, निता देवकुळे, रमाबाई कदम, संगीता जाधव, नंदा पवार, चांगुणा पवार, विलासबाई पवार या महिला सफाई कामगारांना आर्थिक मदत देण्याबरोबरच साडी, चोळी देऊन त्यांचा शिवसेनेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी माजी तालुका पंचायत सदस्य पृथ्वीराज सावंत, तालुका प्रमुख मुन्ना साठे, सुहास पाटील, अरविंद खरात, अजिंक्य काटे, संजय ढेरे, विजय जाधव, बंडु पवार, महेश पारवे, रामदास सावंत, शाहु कोकाटे, गणेश मारकड आदीसह शिवसेनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

रविवार, दि. १२ मार्च २०२३

## दूध घेऊन ८ शेतकऱ्यांना २८ लाख रुपयास गंडवले

**सोलापूर** : आठ शेतकऱ्याकडून दूध घेऊन २८ लाख २० हजार रुपयाची फसवणूक केल्याप्रकरणी मंगळवेढा येथील अद्ययावत मिल्क प्रोसेसिंग युनिटचा मालक आणि मॅनेजर विरुद्ध मंगळवेढाच्या पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नुकताच दाखल केला. यासंदर्भात गणेश रामचंद्र पवार (रा. शनिवार पेठ,मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी अद्ययावत मिल्क युनिटचा मालक सुनील साहेबराव गागरे (रा.राहुरी जि.अहमदनगर) आणि मॅनेजर महेश सखाराम यादव (रा. फलटण जि.सातारा) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गणेश पवार यांनी १ मे ते २० मे २०२२ या दरम्यान मंगळवेढा एमआयडीसी परिसरातील अद्ययावत मिल्क युनिट मध्ये ४१ हजार २१६ लीटर दूध दिले होते. त्याचे १६ लाख २४ हजार ३३७ रुपयाची रक्कम येणे होती.ते पैसे मागण्यासाठी पवार हे गेले असता आरोपींनी पैसे न देता त्यांना शिवीगाळ घेऊन धमकी दिली. तसेच वरील दोघांनी मिळून पवार यांच्याशिवाय विश्वास चौगुले, संतोष कुरे, सुनील गायकवाड, आकाश साळुंखे, सुरेश बाबर, दिनेश वाकडे आणि ब्रह्मदेव सुरवसे यांच्याकडून देखील दूध घेऊन त्यांना पैसे न देता एकूण २८ लाख २० हजार ५७ रुपयाची फसवणूक केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार शेख करीत आहेत.



# आम्हाला गोळ्या घाला अन् संपवून टाका

## ईडीच्या छापेमारीनंतर सायरा मुश्रीफ यांचा उद्रेक

सुराज्य/कोल्हापूर

**‘कितीवेळा येणार या ठिकाणी? किती त्रास द्यायचा? रोज उठून तेच सुरू आहे, रात्रंदिवस जनतेसाठी राबणारा माणूस आहे आणि असं का करता? आम्ही करायचं तरी काय? यांना सांगा आम्हाला एकदाच गोळ्या घालून संपवून टाकायला.’ हे उद्विग्न उद्गार आहेत राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पत्नी सायरा मुश्रीफ यांचे. त्यांच्या घरावर ईडीने दीड महिन्यात तिसऱ्यांदा धाड टाकल्यानंतर त्यांना अश्रू अनावर झाले. त्या आक्रोश करतच माध्यमांसमोर आल्या आणि ‘एकदाच गोळ्या घालून मारून टाकायला सांगा’ असा निरोप ईडीच्या अधिकाऱ्यांना देण्यास त्यांनी माध्यमांना सांगितले.**

हसन मुश्रीफ यांच्याविरोधात आत्तापर्यंत ईडीकडून ३५ कोटींच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुरगूड पोलीस ठाण्यातही त्यांच्यावर ४० कोटींचा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी सकाळी सात वाजता ईडीचे पथक कागलमध्ये पोहोचले. छापेमारी सुरू असताना मुश्रीफ यांची दोन मुले घरी होती. दरम्यान, हसन मुश्रीफ अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी मुंबईत आहेत. मुश्रीफ यांच्या पत्नी सायरा यांनी घरात लहान मुले तसेच मोठा मुलगा आजारी असतानाही ईडीकडून चौकशी होत असल्याची प्रतिक्रिया माध्यमांना दिली.





### पहिल्या दिवशी दिलासा, दुसऱ्या दिवशी झटका

मुश्रीफांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारीच दिले आहेत. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शनिवारी सकाळीच ईडीच्या पथकाने छापेमारी सुरू केली आहे. मुश्रीफ प्रकरणाशी कोणताही थेट संबंध नसताना किरीट सोमय्यांना कोर्टाच्या आदेशांची तसेच एफआयआरची कॉपी सर्वात आधी कशी उपलब्ध होते? असा सवाल न्यायालयाने केला. या प्रकरणी पुणे सत्र न्यायालयाच्या प्रधान न्यायाधीशांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

### याठिकाणी छापेमारी

ईडीकडून हसन मुश्रीफ यांचे निवासस्थान, पुण्यातील ब्रिक्स कंपनीशी निगडीत तसेच सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना, मुलीचे घर, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्यालय तसेच कागल तालुक्यातील सेनापती कापशी आणि गडहिंग्लज तालुक्यातील हरळी येथील जिल्हा बँकेच्या शाखेवर छापेमारी करण्यात आली आहे.

### समर्थकांचा ठिय्या, कार्यकर्त्याने फोडून घेतले डोके

ईडीची धाड पडल्याचे समजताच समर्थकांनी मुश्रीफांच्या निवासस्थानासमोर गर्दी करायला सुरुवात केली. संतप्त समर्थकांनी ईडीचा निषेध करत निवासस्थानाच्या गेटसमोरच ठिय्या मांडला. यावेळी एका कार्यकर्त्याने स्वत:चे डोकेच फोडून घेतले. संतप्त कार्यकर्त्यांना आवरताना पोलिसांची दमछाक झाली. ईडीच्या अधिकाऱ्यांनी गेट बंद घेतले होते. मुश्रीफ कुटुंबीयांना बाहेर सोडले नाही.

### महाविकास आघाडीकडून कारवाईचा निषेध

दरम्यान, हसन मुश्रीफ यांच्यावर ईडीकडून तिसऱ्यांदा छापेमारी झाल्यानंतर राष्ट्रवादीकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील तसेच कॉंग्रेसकडून नाना पटोले, खासदार संजय राऊत यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. ही तिसरी धाड आहे. पहिल्या दोन कारवाईत काय झाले याची माहिती मिळत नाही हे दुर्दैव आहे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

## भाविकांना मिळणार विठ्ठल सेवेची संधी
### मंदिर समिती सकारात्मक

सुराज्य/पंढरपूर

येथील श्री विठ्ठल मंदिरात विनामूल्य सेवा देण्याची इच्छा गेल्या अनेक वर्षांपासून भाविकांकडून व्यक्त केली जात होती. भाविकांच्या या मागणीचा सकारात्मक विचार मंदिर समितीकडून होताना दिसतोय. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी याबाबत संकेत दिल्याने वारकरी संप्रदाय आणि विठ्ठल भक्तात खुशीचे वातावरण आहे.

आम्ही मोफत देवाची सेवा करण्यास तयार असल्याच्या भावना विठ्ठल भक्तातून व्यक्त होत आहेत. राज्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज यांच्यासह गोंदवलेकर महाराज आणि इतर अनेक देवस्थानात भाविकांच्याकडून विनामूल्य सेवा देण्याची व्यवस्था कार्यरत आहे. यामध्ये अधिकारी, व्यापारी यांचेसह सर्वसामान्य भाविक मोफत सेवा देत असतात.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात देखील वारकऱ्यांच्याप्रती सेवा भाव दाखवत अशी सेवा देण्याबाबत भाविकांकडून मागणी होत होती . अशा पद्धतीची सेवा करण्याची संधी मिळाल्यास राज्यभरातील अनेक गवे आणि विविध धार्मिक संस्थांकडून ही मोफत सेवा देण्याची तयारी दाखवण्यात येत आहे.



### मंदिर समितीच्या बैठकीत निर्णय करणार : ठोंबरे

भाविकांनी श्री विठ्ठल सेवा करण्याची मागणी केली तर त्यासाठी मंदिर समितीच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल. भाविक किती दिवसांची सेवा देणार यावरून व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, असे विठ्ठल मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी सांगितले.

सध्या विठ्ठल मंदिरात २७२ कर्मचारी आणि शेकडो हंगामी कर्मचाऱ्यांच्या मदतीने विठ्ठल मंदिर प्रशासन सेवा आहेत. आता मंदिर प्रशासनाने प्रायोगिक तत्त्वावर मोफत विठ्ठल सेवेचा देण्याचा निर्णय मंदिर समितीच्या बैठकीत घेतला जाणार आहे. हा निर्णय घेतल्याने विठ्ठल भक्तांकडून वारकऱ्यांना चांगली वागणूक तर मिळेल याशिवाय मंदिराकडे येणार पैसे भाविकांच्या विकास कामासाठी वापरता येणार आहे.

## वकिलाने आशिलाला कोयत्याने मारले; परस्पर विरोधी तक्रार दाखल

सुराज्य/पंढरपूर

जागा आम्हाला का देत नाही म्हणून कोयत्याने मारहाण केल्याप्रकरणी तर जामीन प्रकरणी अर्ज दिल्याने टोच्याने हल्ला केल्याप्रकरणी दोन परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यामध्ये पहिल्या घटनेत प्रसाद नंदकुमार विधाते रा. गोपाळपूर यास गोपाळपूर येथील जागा आम्हाला का देत नाही म्हणून लखन औदुंबर बोडके याने कोयत्याने डोक्यास मारहाण केली तर अमोल बोडके, राहुल औदुंबर बोडके व प्रवीण बडदे या तिघांनी दमदाटी व शिवीगाळ केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या प्रकरणांमध्ये अमोल औदुंबर बोडके (रा. भाजी मंडई) हे आपल्या कार्यालयामध्ये बसून काम करीत असताना त्यांचाच अशील असलेल्या प्रसाद नंदकुमार विधाते याने, जामीनदाराने तुझ्या सांगण्यावरून मला जामीन व्हायचे नाही असा न्यायालयात अर्ज दिला असल्याचा आरोप करून अमोल बोडके यांच्यावर बर्फ फोडण्याच्या टोच्याने हल्ला केला तसेच त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. या भांडणांमध्ये बोडके यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी गहाळ झाल्याचा देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल असून पहिल्या प्रकरणाचा सहाय्यक फौजदार माळी तर दुसऱ्या प्रकरणाचा पोलीस नाईक येडगे तपास करीत आहेत.



## करकंब येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : करकंब (ता.पंढरपूर) येथे राहणाऱ्या नेताजी नानाजी जाधव (वय ४०) याने राहत्या घराजवळ विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. शुक्रवारी सायंकाळी हा प्रकार घडला. त्याला करकंब येथे प्राथमिक उपचार करून धनाजी जाधव (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## गोपाळपूर येथे चोरीची वाळू वाहतूक करणारी वाहने जप्त

**सोलापूर** : भीमा नदीपात्रातून चोरलेली वाळू वाहतूक करणाऱ्या बिगर नंबरच्या दोन पिकअप जीप तालुका पोलिसांनी पकडून जप्त केली. शुक्रवारी सकाळी गोपाळपूर-मुंढेवाडी रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. चोरून वाळू वाहतूक सुरू असताना पोलिसांनी अचानक छापा टाकला.

एक टाटा झेनॉन योद्धा कंपनीचे बिगर नंबरचे पिकअप व एक महिंद्रा मॅक्स कंपनीचे बिगर नंबरचे पिकअप दिसून आले. प्रत्येकी दीड लाख रुपये किंमतीची ही दोन्ही पिकअप व त्यामधील प्रत्येकी ४ हजर रूपये किंमतीची वाळू असा एकूण ३ लाख ८ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी एका पिकअपचा चालक देविदास बाळू फुले (वय ३६, रा. गोपाळपूर) याला ताब्यात घेण्यात आले. दुसरा चालक पसार झाला. तपास पोलीस हवालदार शिंदे हे करीत आहेत.

## मार्चअखेर ४३ हजार कुटुंबांना मिळणार हक्काचे घर
### घरकुल योजनेतील ३२ हजार घरांची कामे झाले पूर्ण

सुराज्य/सोलापूर

आपल्या हक्काच्या घरात राहणे हे प्रत्येकाचे स्वप्न पूर्ण होते. हे स्पप्न पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर मेहनत करावी लागते. या मेहनतीला शासन मदत करत असून मार्च महिन्याअखेर घरकुल योजनेत आहे. ४३ हजार घरे पूर्ण होणार आहेत. घरकुल योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात ४८ हजार घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

त्यापैकी ४३ हजार घरकुले बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ३२ हजार घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. अपूर्ण असणाऱ्या घरकुलांची कामे येत्या महिन्याभरात पूर्ण करा, अशा सूचना जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी दिली.



लाभार्थी यांनी मिळालेल्या रकमेतून घर बांधून पूर्ण करावे. त्याला कायमचे घर मिळावे असे या योजनेचे उद्दिष्ट आहे. काही लाभार्थी मात्र घर बांधण्यात सुरुवात करत नाही. त्यांच्याकडून पैसे परत घेणे हा शेवटचा पर्याय असतो. त्यामुळे लाभार्थ्यांनी घर बांधावे यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. सध्याच्या लाभार्थ्यांनी लवकर घर बांधल्यास नव्या लाभार्थ्यांना संधी मिळते. याचा विचार करून लवकरात लवकर घर बांधून पूर्ण करावे असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### प्रलंबित घरकूलांसाठी पाठपुरावा करू

**घरकुल संदर्भात जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. जिल्ह्यात ४३ हजार घरकुल बांधणीचे उद्दिष्ट असून आजपर्यंत आजपर्यंत ३२ हजाराच्या आसपास घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तर ११ हजारांच्या आसपास घरकुल बांधकामे प्रलंबित आहेत. त्यासाठी पाठपुरावा करू., असे सीईओ -संदीप कोहिणकर यांनी सांगितले.**

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दाणे दाणे पे लिखा हैं, खाने वाले का नाम..!

**कल्याण**

**358-64-248**

## आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त माढ्यात महाआरोग्य शिबिर

### आमदार शहाजीबापू पाटील यांची उपस्थिती

सुराज्य/माढा

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेच्या वतीने माढ्यातील ग्रामीण रुग्णालयात बुधवार दिनांक १५ मार्च रोजी महिला पुरुषांसह लहान मुलांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनोज ऊर्फ मुन्ना साठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवार दिनांक १५ मार्च रोजी सकाळी दहा ते पाच या वेळेत हे शिबिर होणार असून या शिबिराचे उद्घाटन सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रा.शिवाजीराव सावंत आदी उपस्थित राहणार आहेत.रुग्णांची तपासणी व उपचार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बगाडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी थोरात, माढा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नंदकुमार घोळवे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.तुषार सरवदे, बालरोग तज्ज्ञ डॉ अमोल डुकरे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. निखिल मासाळ, डॉ. प्रणव सातव, डॉ, रोहित दास, डॉ प्रसन्न शहा डॉ, सदानंद व्हनकळस, डॉ, पंकज सातव, डॉ. थोरात यांच्या माध्यमातून होणार आहे. या शिबिरामध्ये बचत गटातील महिलांची तसेच लहान मुलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी होणार आहे. यामध्ये हृदयरोग, दमा, मधुमेह, उच्च रक्तदाब, ईसीजी तपासणी, डोळे तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू तपासणी तसेच हाडांचे आजार, हिमोग्लोबिन, शुगर यासारख्या तपासण्या करण्यात येणार आहेत.

याशिवाय कुपोषित मुले, श्वसनाचे आजार याबाबतही तपासण्या केल्या जाणार आहेत. या सर्व तपासण्या व उपचार तज्ञ डॉक्टरांमार्फत केले जाणार असून औषध उपचारही केले जाणार आहेत. महिला, पुरुष व लहान मुलांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन मुन्ना साठे यांनी केले आहे.पत्रकार परिषदेस शिवसेना शहराध्यक्ष सागर खरात, युवा सेना शहराध्यक्ष स्वप्निल खरात, सचिन कदम आदी उपस्थित होते.







## टेम्पोच्या धडकेत तरुण ठार

**सोलापूर** : टेम्पोच्या धडकेने डोक्यास व पायास जबरदस्त दुखापत होऊन उपचारादरम्यान तरुण मयत झाला.ही घटना केगाव देगाव बायपास हायवेवर देशमुख वस्ती जवळ घडली. संतोष भीमा माने (वय-३८,रा.लाड वस्ती,बाळे रेल्वे स्टेशन जवळ,सोलापूर) हा रस्त्याने जात असताना केगावकडून देगांवकडे जाणाऱ्या विजापूर बायपास हायवेवर शिवाजीनगर तांडाजवळ पांढऱ्या रंगाच्या टेम्पोने धडक दिल्याने गंभीर दुखापत होऊन संतोष माने जखमी झाला. उपचारादरम्यान तो मरण पावला. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पो. कॉ. चेतन पवार यांनी टेम्पो चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे तपास पोलीस निरीक्षक भोईटे हे करीत आहेत.

## कन्हेर येथे सव्वा लाखांची घरफोडी

**सोलापूर** : कन्हेर (ता.माळशिरस) येथील अनंता निवृत्ती जाधव यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह सव्वा लाखाचे त्याचे दागिने पळविले. ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. अनंत जाधव यांच्या बंद खोलीचे कुलूप चोरट्याने पहाटे तोडले. आणि कपाटातील एक लाख रुपये किमतीचे दागिने आणि रोख २० हजार असा ऐवज चोरून नेला. या घरफोडीची नोंद माळशिरस पोलिसात झाली. हवालदार चौगुले पुढील तपास करीत आहेत.

## तिसऱ्या प्रशासकीय राजवटीची वर्षपूर्ती

# सोलापूर महापालिकेवर आतापर्यंत तीन वेळा प्रशासकीय राजवट

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकिय राजवट लागू करण्यात आली. यापूर्वीच्या दोन प्रशासकिय राजवटीत एकूण ६ प्रशासकांनी कार्यभार सांभाळला. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्याने लागू केलेल्या सध्याच्या तिसऱ्या प्रशासकिय कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण झाले आहे.

आत्तापर्यंत आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली-उगले या सध्या प्रशासकिय जबाबदारी सांभाळत आहेत. १ ऑगस्ट १८५२ रोजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली. सोलापूर नगरपालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य आणि क्रांतिकारी असा प्रेरक इतिहास आहे. ब्रिटिश काळात एप्रिल - मे १९३० दरम्यान नगरपालिकेच्या इमारतीवर तिरंगा ध्वज फडकवण्यात आला होता.

पारतंत्र्यातही तब्बल चार दिवस स्वातंत्र्य उपभोगणारे हे क्रांतिकारी शहर म्हणून ओळखले जाते. मार्शल लॉ पुकारण्यात आला होता. महानगरपालिकेचे १ मे १९६४ मध्ये महापालिकेत रूपांतर झाले. दरम्यानच्या काळात महापालिकेचा कारभार व्यवस्थित होत नसल्याच्या तक्रारी तत्कालीन आयुक्तांनी शासनाकडे केल्या. त्यामुळे



दि. १ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे २ वर्ष २१ दिवस पहिल्यांदा प्रशासकिय कारकिर्द होती

पुन्हा दि.६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणता: ४ वर्षे ३ महिने प्रशासकिय कारकिर्द होती. असे यापूर्वी दोन वेळेला प्रशासकिय राजवट लागू करण्यात आली होती. या एकूण ६ वर्षाच्या कालावधीत सोलापूर महापालिकेचा कारभार ६ प्रशासकांनी सांभाळला.

### ■ शीतल तेली-उगले आठव्या प्रशासक


**सहा प्रशासकांनी पाहिले कामकाज :** १९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षाच्या कालावधीत यापूर्वी ६ प्रशासकांनी कामकाज पाहिले. या कार्यकाळात एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमण विरोधात बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात.

**८ मार्च २०२२पासून प्रशासकराज :** महापालिका लोकप्रतिनिधीची पाच वर्षाची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात प्रशासकीय उपसमितीमध्ये एकूण ३८४ ठराव पास करण्यात आले. विविध विकास कामे केली. तर तब्बल सुमारे ७५० कर्मचारी, अधिकाऱ्यांवर विविध प्रकारची रेकॉर्ड ब्रेक कारवाई केली. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून आजतागायत शितल तेली - उगले या प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा कार्यकुशलतेने सांभाळत आहेत.

**तेली-उगले यांच्याकडे तिहेरी पदाचा मुकुट :** सध्याच्या प्रशासक शितल तेली-उगले यांच्याकडे तीन पदाची जबाबदारी आहे. महापालिका आयुक्त, प्रशासक त्याचबरोबर सोलापूर स्मार्ट सिटीच्या सीईओ अशी तीन पदे त्या भूषवित आहेत. हे विशेष ! आज पर्यंतच्या १११ दिवसांच्या कालावधीत त्यांनी विविध प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच सोलापूर शहर स्वच्छ-सुंदर व प्रदूषणमुक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला आहे. शहराच्या पाणीपुरवठ्याकडे त्यांनी प्राधान्याने लक्ष दिले आहे.

## गावडी दारफळमध्ये एका दिवसात दोन घरफोड्या; रोख रकमेसह १७ तोळे सोने लंपास

✔ **उत्तर सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यातील गावडी दारफळ येथे भर दिवसा अज्ञात चोरट्याने दोन घराची घरफोडी करुन रोख रकमेसह, सोने, चांदी ऐवज चोरट्याने लंपास केला आहे. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास दीड ते अडीच दरम्यान घडली.



गावडीदारफळ येथील शेतकरी दत्तात्रय नामदेव भोरे कुटुंबातील सर्वजण शेतात शेतकामाकरिता गेले होते.संधी साधत बंद असलेल्या घराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. कटावणीच्या साह्याने कपाटातील सोन्याचे नेकलेस, गंठण, असा एकूण सहा ते सात तोळे सोने, रोख ५० हजार, कांदे विक्री केलेला ४० हजार रुपयांचा धनादेश चोरट्याने लंपास केला आहे. त्याच गल्लीतील बाजूला राहणाऱ्या अक्षय जगताप यांच्या ही घराचा कडी, कोंयंडा उचकटून चोरट्याने घरामध्ये प्रवेश करून कपाटात ठेवलेल्या सोन्याची माळ, गंठण,१७ ग्रॅमचे नेकलेस, अडीच तोळ्याचे मंगळसूत्र, अंगठी, चांदी, असे एकूण दहा तोळे सोने आणि रोख वीस हजार रुपये चोरीला गेलं असल्याचे सांगितले आहे. दोन्ही परिवारातील १७ तोळे सोने,२० हजार रोख रक्कम आणि चाळीस हजाराचा धनादेश चोरट्याने चोरून नेला आहे. दोन्हीही घरातील व कपाटातील साहित्य चोरट्याने अस्ता व्यस्त फेकून टाकलेले दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, उत्तर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांनी तज्ञाकडून चोराचे ठसे घेण्यात आले आहे. श्वान पथकाला ही पाचारण करण्यात आले होते.श्वान हे सोलापूर रोड वर काही अंतरावर जाऊन घुटमळले आहे. उत्तर तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

> तपास सुरू; लवकरच चोर सापडतील: शिंदे
> गजबजलेल्या ठिकाणी भर दुपारी चोरीची घटना घडली आहे. चौकातील सीसीटीव्ही कॅमेर मुळे लवकरच चोरटे जरबंद होतील. श्वान पथक व चोरट्यांचे ठसे घेतले आहेत, लवकरच चोर पकडण्यात येईल, असे स.पो.नि. नामदेव शिंदे यांनी सांगितले.
> **- नामदेव शिंदे, स.पो.नि.**

## गोकुळ शुगरने दिली यंदाच्या हंगामातील शेतकऱ्यांची सर्व बिले

**सोलापूर जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना**

✔ सुराज्य/अक्कलकोट

यावर्षी अतिरिक्त पावसामुळे ऊस उत्पादक संकटात असताना धोत्रीच्या गोकुळ शुगरने यंदाच्या हंगामातील शेतकऱ्यांची सर्व बीले त्यांच्या खात्यावर जमा केली असल्याची माहिती चेअरमन दत्ताभाऊ शिंदे यांनी दिली.

यावर्षीचा गळीत हंगाम संपल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. यावर्षी एकरी उसाचे उत्पादन घटल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. यातून आम्ही जे उद्दिष्ट ठेवले होते ते देखील साध्य झाले नाही. याला यावर्षीची परिस्थितीच कारणीभूत आहे तरीही यामध्ये शेतकऱ्यांना कोणती अडचण येऊ नये म्हणून आधी सर्व शेतकऱ्यांची



बिले अदा करण्याचा निर्णय घेतला होता म्हणून आज अखेर सर्व बिले हे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली आहेत. यावर्षीचा गाळप हंगाम २५ ऑक्टोबर रोजी सुरू झाला आणि तो १६ फेब्रुवारीला संपला. यात ५ लाख १ हजार ५४० मेट्रिक टन गाळप केले. त्यातून साखर उतारा १०.०१ मिळाला. यंदा उसाचे उत्पादन घटले असले तरी सरासरी प्रतिदिन ५ हजार २०० मेट्रिक टन गाळप सुरू होते.शेतकऱ्यांना प्रतिटन २ हजार २५० रूपयांचा पहिला हप्ता जमा करण्यात आला आहे. भविष्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून या हंगामाची सर्व ऊसबिले अदा करणारा गोकुळ शुगर हा पहिला कारखाना ठरला आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. यावेळी व्हाईस चेअरमन विशाल शिंदे, मॅनेजिंग डायरेक्टर कपिल शिंदे, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर प्रदीप पवार यांच्यासह शेतकी विभाग, कारखान्याचे इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## आधटराव खून प्रकरण; आरोपीला उच्च न्यायालयात जामीन

✔ **सोलापूर :** मोहोळ येथील संतोष आधटराव यांचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या संतोष कानारे(रा. पंढरपूर) यास जामिनीवर मुक्त करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक यांनी नुकतेच दिले. २५ ऑक्टोबर २०१७ रोजी शेजबाभुळगाव शिवारातील सिमेंट पाईपमधे एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह धारदार शस्त्राने खून करून पुरावा नष्ट केल्याच्या अवस्थेत पोलिसांना आढळला होता. पोलीसांच्या तपासात खून संशयित आरोपी संतोष ऊर्फ मुन्ना कानारे आणि त्याच्या साथीदारांनी केल्याचे निष्पन्न झाले.या प्रकरणात पोलिसांनी तिघा विरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली होती. आरोपी कानारे याचा मयत हा मित्र होता. त्यांचात व्याजाचे पैसे आणि अन्य कारणावरून वाद होता. मयत संतोष आधटराव यांना जमीन दाखवण्याचा बहाणा करून आरोपींनी त्यांना शेजबाभुळगाव येथे नेऊन चाकू आणि ऊसतोडीचा कोयत्याने खून केला. आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांचे प्रेत घटना स्थळी टाकून देऊन निघून गेले होते. जिल्हासत्र न्यायालयात जामिन फेटाळल्यानंतर आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात ॲड. विक्रांत फताटे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. विक्रांत फताटे,ॲड.आशुतोष पाटील तर सरकारतर्फे ॲड. दाभोळकर यांनी काम पाहिले.

## शहरातील तीन ठिकाणांहून मोटरसाकली पळवल्या

✔ **सोलापूर :** दिवसेंदिवस शहरातून मोटरसायकली चोरून नेण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील शुभम संजय बंडगर (रा.उमा सहकारी गृहनिर्माण संस्था,सोलापूर) यांच्या राहत्या घरी पार्क करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.बीएफ.४७८७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली.याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत दत्तनगर दाजी पेठेतील शिवशंकर मार्कंडेय गाजूल यांनी आपल्या घरासमोर पार्क करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३. एई.६१५४ ही अज्ञात चोरट्याने चोरून दिली.जेलरोड पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे. तर तिसऱ्या घटनेत गुरुनानक चौकातील शासकिय ग्राउंड या ठिकाणी पार्क करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३ डी.एफ.९४२५ ही चोरून नेली.लक्ष्मण नागाप्पा जोशी (रा.वेणुगोपाल नगर,कुमठा नाका,सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## बऱ्हाणपूर येथे ४० शेतकऱ्यांना तुषार संचचे वितरण

✔ सुराज्य/अक्कलकोट

युनायटेड वे मुंबई यांच्या अंमलबजावणी मधील जल संजीवनी प्रकल्प अंतर्गत कोवेस्ट्रो प्रायव्हेट लिमिटेड यांच्या अर्थसहाय्याने ४० शेतकऱ्यांना तुषार संचचे वितरित करण्यात आली आहे. उर्वरित सर्व शेतकऱ्यांनी संजीवनी प्रकल्पचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी केले.




बऱ्हाणपूर येथे तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या हस्ते जल संजीवनी अंतर्गत ४० शेतकऱ्यांना तुषार संचचे वितरण करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास मंडल अधिकारी राजकुमार कोळी, भीमाशंकर ढाले, समुह संघटक अजीज तांबोळी, अभियंता कृष्णा खेंडके, बुऱ्हाणपूर चे सरपंच शबनम पटेल- पीरजादे, डोंबरजवळगे सरपंच चिदानंद माळगे, कृषि सहाय्यक रोहित थोरात,ग्रामसेवक संदीप पाचंगे, अश्रफअली पटेल, उपाध्यक्ष बाशाभाई पीरजादे, सचिव डॉ.इसाम पीरजादे, ग्रा.पं.सदस्य दीपक बनसोडे, खयुम पीरजादे, पोलिस पाटील मारुती बनसोडे, असुदुलाह पीरजादे, युसूफ पटेल, शाहिद मनियार, उत्तम बनसोडे, हनमंत्तपा नागेशी,रसूल जमादार, अरबाज मकानदार, अशोक सुलगडले, बसव गुरव, नदीम पीरजादे, अलिम शेख, इरफान काजी, म. कैफ, हाफिज पीरजादे, जाकिर पीरजादे, अकबर पीरजादे, जग्गनाथ बंदीछोडे, अंजना इरवाडकर व वीरश्री सुलगडले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक भिमाशंकर ढाले आणि सूत्रसंचालन समूह संघटक अजिज तांबोळी यांनी तर मैनोद्दिन पटेल यांनी आभार व्यक्त केले.

## लोखंडी पाईपने मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

भाजी विक्री करत असताना मागील भांडणाचा राग मनात धरून लोखंडी पाईप डोक्यात मारहाण करून जखमी केले.ही घटना चैतन्य भाजी मार्केट जुळे सोलापूर येथे घडली.

राजकुमार तिपण्णा व्होनकोरे (वय-३९,रा. इंदिरानगर, विजापूर रोड सोलापूर) हे भाजी विक्री करत असताना आरोपी ऋषिकेश बनसोडे, दामोदर चव्हाण, रोहित बिराजदार (रा. सर्वजण विजापूर रोड, सोलापूर) या तिघांनी मारहाण केली. विजापूर नाका पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे. तपास पोलीस हवालदार जाधव हे करत आहेत.

## शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे छत्रपती संभाजीराजेंना अभिवादन

✔ सुराज्य/सोलापूर

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज चौकातील पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



विलासी जीवन जगण्याची संधी उपलब्ध असतानाही शिवरायांनी निर्मिलेले पवित्र हिंदवी स्वराज्य, या मराठी मुलखाचा स्वाभिमान अबाधित रहावा, भगवा ध्वज डौलाने फडकत रहावा म्हणून ४० दिवस आपल्या शरीराचा एक - एक अवयव गमावत, प्रचंड यातना सहन करून छत्रपती संभाजी राजांनी प्राणाचे बलिदान दिले. ज्यांच्या बलिदानाने या राष्ट्राला पुनरुज्जीवन मिळाले त्या शंभू महाराजांच्या तेजस्वी पराक्रमाला, त्यांच्या बलिदानाला मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने मानाचा मुजरा करण्यात आला.

या प्रसंगी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष नानासाहेब काळे, उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, उत्सव अध्यक्ष मतीन बागवान, सुनील शेळके, भाऊसाहेब रोडगे, शिवाजी वाघमोडे,प्रकाश ननवरे,विकास फुटाणे, राजू हुंडेकरी देविदास घुले, बजरंग जाधव, सचिन स्वामी रमेश जाधव आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## नियम डावलून मळीची वाहतूक; उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष

### ॲड.सुजितकुमार थिटे यांचा आरोप

✔ **सोलापूर :** साखर कारखान्यातून निघणारी मळी अरवनी प्रकल्पासाठी टँकरच्या माध्यमातून वाहतूक केली जाते परंतु हे टँकर दीड ते दुप्पट क्षमतेने मळीची वाहतूक करतात वास्तविक हे नियम डावलून वाहतूक केली जात आहे. राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांनी यावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव ॲड सुजित कुमार थिटे यांनी केली आहे.



ओव्हरलोड मळी वाहतुकीवर निर्बंध आणावेत यासाठी भाजपा युवा प्रदेश सचिव ॲड सुजित कुमार थिटे यांनी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक डॉक्टर नितीन धार्मिक यांना सोलापूर येथे भेटून निवेदन देण्यात दिले होते. या वाहनातून नियमाप्रमाणे वाहतूक व्हावी व जे टँकर नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी असे निवेदनात म्हटले होते. यावर डॉक्टर नितीन धार्मिक यांनी कार्यवाही करत नियंत्रणही आणले होते पण काही कारखाने आदेश धुडकावून वाहतूक करत आहेत. अजूनही काही कारखान्यात ओव्हरलोडींग मॉलिसेस त्या कारखान्यातील राज्य उत्पादन शुल्कातील निरीक्षक यांना धरुन जाणून-बुजून संगनमताने टँकरमध्ये मळी क्षमतेपेक्षा जास्त मळी भरून देण्याचे काम सुरू आहे. हे नियंत्रणात आणले नाहीत तर त्या निरीक्षकांन विरुद्ध राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालय मुंबई यांच्या कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे करण्याचा निर्धार थिटे यांनी केला आहे.

## टेम्पोच्या धडकेत तरुण जागीच ठार

✔ **सोलापूर :** टेम्पोच्या धडकेने डोक्यास व पायास जबरदस्त दुखापत होऊन उपचारादरम्यान तरुण मयत झाला. ही घटना केगाव देगाव बायपास हायवेवर देशमुख वस्ती जवळ घडली.

या घटनेची हकीकत अशी की, संतोष भिमा माने (वय-३८, रा.लाड वस्ती, बाळे रेल्वे स्टेशन जवळ,सोलापूर) हा रस्त्याने जात असताना केगावकडून देगांवकडे जाणाऱ्या विजापूर बायपास हायवेवर शिवाजीनगर तांडा जवळ अज्ञात पांढऱ्या रंगाच्या टेम्पोने धडक दिल्याने गंभीर दुखापत होऊन संतोष माने जखमी झाला. उपचारादरम्यान त्याला दवाखान्यात दाखल केले असता,तो मरण पावला. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल चेतन पवार यांनी अज्ञात पांढऱ्या रंगाच्या टेम्पो चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस निरीक्षक भोईटे हे करीत आहेत.


## आरोग्यदूत, कार्यसम्राट : आमदार रामभाऊ सातपुते

### वाढदिवसानिमित्त

माळशिरस राखीव विधानसभा मतदार संघात २०१९ मध्ये भाजपचे उमेदवार म्हणून राम सातपुते उभे राहिले. तेव्हा खरे तर बाहेरील जिल्ह्यातून आयात केलेला उमेदवार म्हणून त्यांना हिणवले गेले. पण ज्यावेळेस ते आमदार म्हणून निवडुन आले आणी अगदी थोडयाच दिवसात त्यांनी आपल्या कामाची छाप मतदार संघात सोडली.

सर्वसामान्य माणसांच्यस अडी अडचणी ऐकुन घेऊन तोडगा काढण, माळशिरस येथे जनता दरबार घेऊन सर्वसामान्यांची समोरच अधिकाऱ्यांना फोन करुन ताबडतोब अडचणीवर तोडगा काढणे, तालुक्यातील शेतकऱ्यांनची महाविकास आघाडीचे सरकार असताना विज तोडणी संबंधित केलेले आंदोलन असेल, निरा देवधरच्या पाण्याचा प्रश्न असो किंवा तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ताचे असो किंवा इतर विकास कामे करण्यात त्यांचा हातखंडा आहे.भाजपचे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. विकास कामांबरोबरच तालुक्यातील दुर्धर आजार अपघात ज्यावर सर्वसामान्य नागरिकांना उपचार करणे शक्यच नाही अशी महागडी ऑपरेशन मोफत करुन देऊन त्यांनी तालुक्यातील अनेक गोरगरीबांना जिवदान देऊन त्यांच्या जिवनात पुन्हा जिवन नव्या उमेदीने जगण्याची उमेद निर्माण केली आहे. त्यामुळे ते सर्वसामान्य नागरिकांनसाठी आरोगयदुतच आहेत. तालुक्यातील भाजपमधील जुना भाजपचा गट व मोहीते पाटील गट यांच्या मध्ये योग्य समन्वय साधण्याचे काम सुध्दा लोकप्रतिनिधी म्हणून करीत आहेत. त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच तालुकावासीयांच्यवतीने यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.




## नातेपुते येथे रंगपंचमीनिमित्त रंग, पिचकारी खरेदीसाठी गर्दी

✔ सुराज्य/नातेपुते

बाजारपेठेत रंगपंचमी सणानिमित्त विविध डिझाईनच्या पिचकारी तसेच रंग या साहित्याने अनेक दुकाने सजली असून रंगपंचमीच्या पूर्वसंध्येला शनिवारी नातेपुते शहरातील दुकानात रंग, पिचकारी खरेदीसाठी लहान मुले व नागरिकांनी गर्दी केली होती.



मागील वर्षी कोरोनाचा कहर वाढल्यामुळे रंगपंचमी मोठ्या प्रमाणात साजरी झाली नाही. त्यामुळे अनेकांनी यंदाची रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी करण्याचा मानस बाळगला आहे.बच्चे कंपनीच्या आग्रहाखातर पालक वर्गाने पिचकारी, कोरडे रंग, खाद्य रंग, नैसर्गिक रंग आदींची खरेदी करण्यास जोर धरला आहे.विशेष म्हणजे मागील वर्षी कोरोनामुळे साजरी न करता आलेली रंगपंचमी यंदा जोरात करण्याचा पवित्रा बच्चे कंपनीबरोबरच मोठ्यांनीही घेतला आहे. त्यामुळे शहरातील रंगांची दुकाने शनिवारी दिवसभर गर्दीने भरली होती. रंगीबेरंगी पिचकाऱ्यांसह बाजारपेठेतील दुकानात पाठीवरचा पंप, छोटा भीम, मोटू-पतलू, डोरेमॉन, सिनचॅन, आदी पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत. बाजारात पिचकाऱ्यांची किंमत २० पासून ६०० रुपयांपर्यंत होत्या. पॅकिंगप्रमाणे नैसर्गिक, रासायनिक, पर्यावरणपुरक, खाद्य रंगांची विक्री सुरु होती. अनेक छोटे-मोठे बालक तसेच पालक रंग पिचकारी व रंग खरेदी करण्यात दंग होते.

> कोरोना नंतर यावर्षी रंगपंचमी साजरी करण्यासाठी लहान मुलांबरोबरच नागरिकांचाही उत्साह मोठ्या प्रमाणात आहे. नागरिक केमिकलचा कलर न घेता इको फ्रेंडली व हरबल कलरला जास्त मागणी नागरिक करीत आहेत. मागील वर्षीपेक्षा यावर्षी रंगपंचमीसाठी पिचकारी व कलर जास्त प्रमाणात विकला गेला असून यावर्षी वॉटर बलून व कार्टून पिचकारीला जास्त मागणी आहे, असे महावीर अँड मोनी इंटरप्राईजेसचे महावीर दोशी यांनी सांगितले.



## ठाकरे गट, जिल्हा कोळी महासंघातर्फे महिलांचा सत्कार

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट महिला जागतिक दिनाचे औचित्य साधून अक्कलकोट येथे अक्कलकोट शहर व दक्षिण पोलीस स्टेशन येथे ठाकरे गट व सोलापूर जिल्हा कोळी महासंघाच्यावतीने पोलीस महिलांचा सत्कार शिवसेना जिल्हा समन्वयक व कोळी महासंघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अरूणभाऊ लोणारी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. यावेळी जिल्हा उपप्रमुख संतोष पाटील, शहराध्यक्ष मल्लिनाथ खुबा, महासंघ तालुकाध्यक्ष ऋषिकेश लोणारी, महासंघ शहराध्यक्ष श्रीशैल रोडगे, नेते बसवराज कोळी, शिवप्पा करजगी, आरपी कोळी शिवपुरे, तम्मा शेळके, शिवसेना संघटक सोपान निकते, रवी डोके, नंदू हंचाटे, स्वामीराव मोरे, महमंद पठाण, अय्याज जमादार, शेडम, अळवीकर, महासंघ दादा कौलगी, राजू कोळी, श्रीमंत करजगी, महेश कोळी, गुंडू कोळी, बसवराज करजगी, डेप्युटी भिमा करजगी, रवी कोळी, अर्जुन जमादार, राजू कोळी, प्रशांत कोळी उपस्थित होते. शिवसेना जिल्हा समन्वयकपदी अरूणभाऊ लोणारी यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच अक्कलकोट तालुक्यातील मुख्य समस्यांचे निवेदन नायब तहसीलदारांन देण्यात आले.




## मातोश्री स्व. गंगूबाई मिरगणे यांच्या स्मृतीनिमित्त भजन संमेलन

**सुराज्य/बार्शी** : येथील निताई बहुउद्देशीय संस्था संचलित महिला आधार केंद्राच्यावतीने महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांच्या मातोश्री गंगुबाई सुखदेव मिरगणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भजनी संमेलन आयोजित करण्यात आले होते. हे संमेलन भगवंत मार्गावरील स्व. शोभाताई बहुउद्देशीय सभागृहात झाले. या संमेलनात श्रीराम भजनी मंडळ, श्री स्वामी समर्थ, लक्ष्मी नवरात्री, श्रीहरी ज्ञानेश्वर, मुरलीधर, सरस्वती, ओंकार, भागीरथी, जनाई, वरदायिनी, कुलस्वामनी, नामदेव शिंपी आदींसह वीस भजनी मंडळे सहभागी झाली होती. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा निता देव, माधुरी परदेशी, साधना अग्निहोत्री आदींच्या हस्ते सर्व भजनी मंडळांच्या अध्यक्षांना स्व. गंगूबाई सुखदेव मिरगणे स्मृती पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. भजनी संमेलनासाठी तबला, पखवाज, हार्मोनिअम, ताळ, मृदंग या वाद्य साधनांचीही संगत होती. संमेलनात सहभागी महिलांना भेट वस्तू देण्यात आली. संमेलनासाठी रश्मी पुराणिक, बेलसरे काका, मृदला देव यांनी परिश्रम घेतले.




## नारीशक्ती पुरस्कार देऊन अंबिका पाटील सन्मानित

**सुराज्य/सोलापूर** : लिंगायत असोसिएशन महाराष्ट्र राज्यकडून स्वप्नपूर्ती महिला सामाजिक संस्थाचे अध्यक्षा अंबिकाताई पाटील यांना नारीशक्तीचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूरच्या लिंगायत असोसिएशनच्यावतीने नारीशक्तीच्या कार्यगौरव सोहळ्यात आगळावेगळा पद्धतीने सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ बसव प्रचारक सिंधुताई काडादी होत्या. त्यांच्या हस्ते अंबिकाताई पाटील यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास बसवरूढ मठाचे मठाधीश शिवपुत्र महास्वामी, शिवसेना जिल्हाप्रमुख शिंदे गट मनीष काळजे, डॉ. स्मिता चाकोते, अक्कलकोट तालुका भाजपा महिला अध्यक्षा सुरेखा होळीकट्टी, विठ्ठल काळजे, ठाणे अंमलदार, पद्मावती शिवगुंडे, ॲड. संतोष होसमनी आदी उपस्थित होते.

## प्रेमविवाह केल्याच्या रागातून घरामध्ये घुसून मारहाण

**सुराज्य/अकलूज** : माळशिरस तालुक्यातील संगम येथे प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून घरात घुसून मारहाण केल्याप्रकरणी १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संगम येथील कृष्णा महादेव रत्नपारखी व निकिता दीपक लावंड यांनी एकमेकांवर असलेल्या प्रेमाचे रूपांतर लग्नात केले. पंधरा दिवसापूर्वीच त्यांनी प्रेमविवाह केला. परंतु हा प्रेमविवाह निकिता लावंड यांच्या घरच्यांना मान्य नव्हता. ५ मार्च रोजी मुलीच्या घरच्यांकडून मुलाच्या आईस ती एकटीच असताना घरात घुसून बेकायदेशीर जमाव जमवून हाताने लाथाबुक्क्यांनी, लाठाकाठ्यांनी, दगडांनी किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभूत होऊन घरातील साहित्याची व घराची तोडफोड करुन नुकसान केले आहे. याबाबत मुलाची आई सरस्वती महादेव रत्नपारखी (वय-४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिपक कृष्णा लावंड, निलम दिपक लावंड, सुमन कृष्णा लावंड, रेणुका अनिल लावंड, अनिल कृष्णा लावंड, रंजना सिध्देश्वर लावंड, स्वप्नाली अमोल माने, यशवंत मोहन माने, सानिका यशवंत माने, नवनाथ मोहन मान, आकाश ऊर्फ अक्षय अनिल लावंड, कोमल अनिल लावंड, मोहन रघुनाथ माने, विमल मोहन मान, रोहिदास सिध्देश्वर लावंड (सर्व रा. संगम दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पो. ना. जाधव हे करीत आहेत.

## विश्वनाथ उंबरजे यांचे निधन

**सुराज्य/अक्कलकोट**: जि. प. प्रा. कुंभार वस्ती शाळा करजगी येथील शिक्षक विश्वनाथ पंचप्पा उंबरजे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे.



एक आदर्श असलेले शिक्षक निघून गेल्यामुळे संपूर्ण शिक्षक परिवारात हळहळ व्यक्त होत आहे.

# दोन्ही पालखी मार्गांची गडकरींकडून पाहणी

**सुराज्य/पंढरपूर**

**महाराष्ट्रातील देहू व पंढरपूर या दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची शनिवारी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यासह पाहणी केली.**

श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (राष्ट्रीय महामार्ग-९६५ जी) हा १३० किमी लांबीचा महामार्ग पुणे जिल्ह्यातील पाटस - बारामती - इंदापूर - अकलूज - बोंडले पर्यंत विकसित करण्यात येत आहे. या मार्गावर एकूण ११ पालखी स्थळे आहेत. वारकऱ्यांच्या सोयीसाठी या सर्व ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. पालखी मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी महाराष्ट्रातील संत महात्म्यांची शिल्पे, भित्तीचित्रे, अभंगवाणी आदी सुविधांसह सौंदर्यीकरण करण्यात येईल. यामुळे मार्गाच्या सौंदर्यात भर पडेल तसेच वारकऱ्यांना वारीच्या दरम्यान या सुविधांचा फायदा होईल.

पालखी मार्गावर विशिष्ट प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असून यामध्ये विशेषतः चंदन, तुळशी, इतर सुगंधित वृक्षांबरोबरच वड, कडुनिंब, पिंपळ, चिंच या सावली देणाऱ्या



वनौषधी वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. सद्यस्थितीत रस्त्याच्या मध्यात ५७,२०० व दोन्ही बाजूस मिळून १८,८४० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (राष्ट्रीय महामार्ग - ९६५) हा २३४ किमी लांबीचा मार्ग हडपसर (पुणे) - सासवड - जेजुरी - निरा - लोणंद - फलटण - नातेपुते - माळशिरस - बोंडले - वाखरी - पंढरपूर असा असून या चौपदरी रस्त्याच्या दोन्ही बाजूला वारकऱ्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र पालखी मार्ग समाविष्ट करण्यात आला आहे. या मार्गावर एकूण १२ पालखी स्थळे असून याठिकाणी वारकऱ्यांसाठी आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येतील. पालखी मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंस वृक्षारोपण करण्याबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी महाराष्ट्रातील संत महात्म्यांची शिल्पे, भित्तीचित्रे, अभंगवाणी आदी बाबींवर आधारित काम करण्यात येईल. यामुळे मार्गाच्या सौंदर्यात भर पडेल तसेच वारकऱ्यांना वारीच्या दरम्यान या सुविधांचा फायदा होईल.

### पालखी मार्गावर वृक्षांची लागवड

पालखी मार्गावर विशिष्ट प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असून यामध्ये विशेषतः चंदन, तुळशी, इतर सुगंधित वृक्षांबरोबरच वड, कडुनिंब, पिंपळ, चिंच या सावली देणाऱ्या वनौषधी वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. सद्यस्थितीत रस्त्याच्या मध्यात ५७,२०० व दोन्ही बाजूस मिळून १८,८४० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

## रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी ७५ कोटींचा निधी : आ. आवताडे

**सुराज्य/मंगळवेढा**

पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या मजबुती व सुधारणा करणे कामांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस व अर्थ राज्यमंत्री दीपक केसरकर यांच्या माध्यमातून ७५ कोटींचा रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती समाधान आवताडे यांनी दिली.

दोन्ही तालुक्यातील दळणवळण सुविधेच्या अनुषंगाने विविध रस्ते गेल्या अनेक दिवसांपासून मजबूत व दुरुस्त करणे अतिशय गरजेचे झाले. सदर रस्त्यांच्या आजूबाजूला वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या प्रवास मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी हे रस्ते सुधारित करण्यात यावेत यासाठी आवताडे यांनी संबंधित विभागाकडे या रस्त्यांसाठी आर्थिक तरतूद करण्याची मागणी पत्राद्वारे केली. या मागणीची राज्य पातळीवर दाखल घेऊन हा निधी मंजूर झाला मंजूर झाल्याचे आवताडे यांनी सांगितले.

## माळशिरस जिल्हासत्र न्यायालयाच्या नव्या इमारतीसाठी २० कोटींची तरतूद : आ. मोहिते-पाटील



**सुराज्य/अकलूज**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माळशिरस येथील जिल्हासत्र न्यायालयाच्या नूतन इमारत बांधकामाकरीता २० कोटी रूपयांची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली असल्याची माहिती आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. ९९ माळशिरस येथे २६ ऑक्टोबर १९६५ मध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय सुरु झाले. त्यानंतर राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील यांनी तालुक्याची गरज ओळखून सन २००४ मध्ये अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायाधीश वरीष्ठस्तर ही दोन नवीन न्यायालये मंजूर करुन घेतली होती.

१९६५ सालची इमारत या न्यायालयासाठी कमी पडत असल्याने त्याच कालावधीत माजी उपमुख्यमंत्री मोहिते-पाटील यांनी नवीन न्यायालयीन इमारतीसाठी सुमारे दोन हेक्टर जागा मिळवून दिली. या जागेवरच नवीन न्यायालयीन इमारत व इतर सुविधा बाबत आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी वेळोवेळी सरकारकडे पाठपुरावा केला होता.

जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीचा तळमजला १४५१.०६ चौ.मी., पहिला मजला ३६८९.३५ चौ. मी., दुसरा मजला ३७४४.५० चौ. मी. आणि तिसरा मजला ३७२६.६८ चौ. मी. असे मिळून एकूण १२६११.६१ चौ. मी. क्षेत्रफळाचे बांधकाम असलेली इमारत बांधण्यात येणार आहे.

## २५ वाहने गायब करणारा आरोपी गजाआड

### सव्वा कोटींची वाहने जप्त; कामती पोलिसांची कामगिरी

**सुराज्य/विरवडे बु.**

**लोकांना विश्वासात घेऊन एक-दोन नव्हे तब्बल २५ वाहने गायब करणाऱ्या आरोपीस कामती पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून एक कोटी २० लाख रुपयांची वाहने जप्त करण्यात आली आहेत.**



मोहोळ तालुक्यातील कामती पोलीस स्टेशनच्या हद्दीत हराळवाडी येथे राहणारा गणेश हिंदूराव माडकर हा सोलापूर येथे कामाला होता तो गावी परत आल्यानंतर गावातील तसेच जवळच्या भागातील ज्या नागरिकांकडे चार चाकी वाहने आहेत, अशा लोकांना विश्वासात घेऊन मला फिरायला जाण्यासाठी गाडी पाहिजे, असे सांगून चार चाकी वाहन घेत असे मात्र ते वाहन परत न करता त्याचे परस्पर अपहरण करत होता.

याच दरम्यान आरोपीने कोरवली ता. मोहोळ येथील शरद सुरेश पवार यास विश्वासात घेऊन त्यांच्याकडून चार चाकी गाडी (क्रमांक एम. एच. १३ डी टी २४०२) हे वाहन २२ फेब्रुवारी रोजी घेऊन गेला परंतु त्यांनी ती कार परत केली नाही. पवार यांनी त्याच्याकडे वेळोवेळी गाडीची मागणी केली असता तो आज देतो उद्या देतो असे सांगून वेळ मारून नेत होता.

दरम्यान याबाबत शरद पवार यांनी कामती पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक गिरीष सरदेशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती कामती पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अंकुश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बबन माने, यशवंत काठमळे, अमोल नायकोडे, भरत चौधरी यांच्या पथकाने तपास सुरु केला होता.

८ ट्रॅक्टर १४ जीप व कार, ३ मोटरसायकली अशी १ कोटी २० लाख ५० हजार रुपये किमतीची २५ वाहने पोलिसांनी जप्त केली आहेत. आरोपीला अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्यास ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## आष्टी तलाव दुरुस्तीसाठी ४० कोटींची तरतूद

**सुराज्य/मोहोळ**

मोहोळ तालुक्यातील ऐतिहासिक अशा आष्टी तलावाच्या दुरुस्तीसाठी शिंदे-फडणवीस सरकारने नुकत्याच सादर केलेल्या बजेट मध्ये ४० कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती भाजपचे जिल्हा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष रणजीत चवरे यांनी दिली. चवरे यांनी आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे यासाठी पाठपुरावा केला होता. त्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मोहोळ तालुक्यात आष्टी तलाव प्रसिद्ध आहे. या तलावाची निर्मिती ब्रिटिश कालीन राणी व्हिक्टोरिया यांनी केली होती. पावसाच्या पाण्यावरील हा तलाव आष्टी, रोपळे, येवती या गावातील २ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर उभारला आहे. त्याची पाणी साठवण क्षमता एक टीएमसी इतकी आहे. या तलावाची अत्यंत दुरावस्था झाली असून, पडझड झाली आहे. या तलावावर सध्या सुमारे २३ हजार हेक्टर क्षेत्र बागायती आहे, तर सहा ते सात पिण्याच्या पाण्याच्या योजना कार्यान्वित आहेत.

आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी व आष्टी तलाव दुरुस्तीसाठी आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांनी १०० कोटी रुपयांची मागणी केली होती. बजेटमध्ये तलाव दुरुस्तीसाठी ४० कोटी रुपयांची तरतूद आमदार मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्या मुळे झाली असल्याचे चवरे यांनी सांगितले.

## आज रंगपंचमी

## सांगोल्यात उत्साहाला उधाण



**सुराज्य/सांगोला**

धुलिवंदनापासून सुरु झालेल्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी ५ दिवस पूर्ण होतात. रंगपंचमी हा सण फाल्गुन कृष्ण पंचमी या तिथीला साजरा केला जातो. रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण. एकमेकांना रंग लावून एक अनोखा आनंदोत्सव रंगपंचमीदिवशी साजरा केला जातो. रविवारी १२ मार्च रोजी रंगपंचमीचा सण असून या सणाच्या स्वागतासाठी सांगोला शहरातील बाजारपेठ ही पिचकारी व विविध रंगीबेरंगी रंगांनी फुलल्याचे चित्र दिसून येत आहे. विविध ठिकाणी रंगाचे व पिचकारीचे स्टॉल हात गाडी विक्रीसाठी सज्ज झाले आहे.

होळीपासून सांगोला शहरात सध्या सर्वत्र हलगीचा आवाज रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर सध्या ऐकावयास मिळत आहे. लहान मुले व चिमुकली बालके हातातील छोट्या हलग्या वाजवत रंगपंचमी दिवशी सामुदायिक रंग खेळण्यासाठी मोठ्या भावंडांकडून व गल्लीतील व्यापारी मंडळींकडून पैसे गोळा करताना दिसत आहेत. चिमुकली मुले हा सण साजरा करण्यासाठी पैशाची जमवाजमव करत आहेत.

## महिलांनी मुलांना आध्यात्मिक संस्कारही द्यावेत : उरणे

**सुराज्य/वेळापूर**

'आजच्या पिढीला चांगले संस्कार मिळणे ही काळाची गरज आहे मुलांना शिक्षणाबरोबरच त्यांना बालसंस्कार, अध्यात्मकाचे ही संस्कार दिले गेले पाहिजेत, तुमचे म्हातारपण सुखकारक जावेसे वाटत असेल तर मुलांना संस्कार देणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर अंतर्गत परिवर्तन लोकसंचलित वेळापूरच्या साधना केंद्र सचिवा अर्चना उरणे यांनी केले.'

तांदळवाडी तालुका माळशिरस येथील कृष्णा मंगल कार्यालय येथे घेण्यात आलेल्या जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमांमध्ये उरणे बोलत होत्या. गट समन्वयक वैशाली इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिनाच्या कार्यक्रमाचे ओम साई व स्वप्नपूर्ती बचत



गट यांच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन अर्चना उरणे, डा. ज्योती शेटे, सीमा काळे, डॉ. मनीषा पवार यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी महिला दिनानिमित्त चमचा लिंबू, तळ्यात मळ्यात, संगीत खुर्ची, उखाणे आधी स्पर्धा घेण्यात आल्या. तळ्यात मळ्यात स्पर्धेत माधुरी पवार, संगीत खुर्ची स्पर्धेत विजेत्या ऋतुजा चोरमले, उखाणा स्पर्धेत पिंकू धांडोरे यांनी यश मिळवले. यावेळी डॉ. ज्योती शेटे, सीमा काळे, डॉ. मनीषा पवार, मिलिंद गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला पारू राजगुडे, सीताबाई वायमारे, कुंदा पारवे, शोभा माने, कोमल मगर, क्षेत्र समन्वयक पिंकू धांडोरे, आशा पवार, रूपाली बंद पट्टे, ताहीर बागवान, अजित बनसोडे, जयश्री कदम, रूपाली पवार, ओम साई व स्वप्नपूर्ती गटाच्या अध्यक्षा, सचिव, व सदस्य, मंजुश्री डोळसकर, काजल कांबळे यांच्यासह महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाला विदर्भ कोकण बँकेच्यावतीने दिपाली घाडगे यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

# संत चोखामेळा यांच्या मंदिराचे काम त्वरित सुरु करा

### दिलीप धोत्रे यांची मागणी; आंदोलनाचा इशारा

**सुराज्य/पंढरपूर**

शहरातील तुळशी वृंदावन येथील संत चोखोबा मेळा यांचे मंदिर पडून गेले आठ दिवस झाले. परंतु आतापर्यंत मंदिराचे काम चालू करण्यात आले नाही. प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे येत्या आठ दिवसांमध्ये जर मंदिराचे काम चालू नाही केले तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने पंढरपूर येथील वनअधिकारी चैताली वाघ यांना संत चोखोबा मेळा



मंदिर उभारणीचे काम त्वरित सुरू करावे यासाठी निवेदन देण्यात आले.

पंढरपूर शहरात राज्यातून नव्हे तर संपूर्ण देशातून भाविक येत असतात. या भाविकांना दिलासा मिळण्यासाठी तसेच विविध संतांचे दर्शन मिळावे म्हणून पंढरपूर शहरांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून तुळशी वृंदावनाची निर्मिती करण्यात आली आहे. या तुळशी वृंदावनामध्ये विविध संतांची मंदिरे उभी करण्यात आली आहेत. गेल्या आठ दिवसांपूर्वी यातील संत चोखोबा मेळा यांचे मंदिर अचानक पडले. नक्की ते मंदिर कशामुळे पडले याची सखोल चौकशी करण्याची मागणी धोत्रे यांनी केली आहे. वास्तविक फक्त तीन वर्षांपूर्वीच या तुळशी वृंदावनाची निर्मिती करण्यात आली असून या ठिकाणी विविध संतांचे मंदिरे बांधण्यात आले आहेत. तीन वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले मंदिर पडले आहे याचा अर्थ या ठिकाणी केलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर आणि अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी देखील धोत्रे यांनी केली आहे. त्वरित करावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वखर्चाने या मंदिराची उभारणी करेल, असेही दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, शहराध्यक्ष संतोष कवडे, उपशहराध्यक्ष गणेश पिंपळनेरकर, विभागाध्यक्ष नागेश इंगोले, विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष प्रताप भोसले, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अवधुत गडकरी आदी उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात वस्त्रोद्योगाचे धागे जुळले

## ७०८ कोटींची भरघोस तरतूद

सुराज्य/मुंबई

**राज्याच्या अर्थसंकल्पात नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्याची घोषणा करतानाच वस्त्रोद्योगाच्या विविध घटकांसाठी ७०८ कोटी रुपयांची भरघोस तरतूद केली आहे. अर्थसंकल्पात वस्त्रोद्योगासाठी नवीन कोणतीही योजना जाहीर करण्यात आलेली नाही. यंत्रमाग सहकारी संस्थांच्या भाग भांडवल व कर्जवाटप यासाठी निधीमध्ये कपात केली आहे. केंद्र शासनानंतर राज्य शासनाच्या अर्थसंकल्पाकडे वस्त्रोद्योगाचे लक्ष लागले होते. वस्त्रोद्योगाकडे नेहमी कानाडोळा केला जातो. पण अर्थसंकल्पात जादा तरतूद केल्याने वस्त्रोद्योगाला संजीवनी मिळेल, असे जाणकारांचे मत आहे.**



**प्रकल्प वाढीस उत्तेजन**

राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या विविध सवलतीसाठी २३० कोटींची तरतूद केली आहे. वस्त्रोद्योग प्रकल्पाच्या उभारणीसाठी भांडवली अनुदानापोटी ३१५ कोटींची गतवर्षीपेक्षा यंदा व्यापक तरतूद अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. खासगी वस्त्रोद्योगातील प्रकल्पवाढीस उत्तेजन मिळणार असल्याचे आमदार प्रकाश आवाडे यांनी सांगितले.

वस्त्रोद्योग संकुल उभारण्यासाठी ७ कोटी, वस्त्रोद्योगातील छोटे उद्योगांसाठी भांडवली अनुदानापोटी ६० कोटी, सूत गिरण्या व वस्त्रोद्योगातील विविध घटकांसाठी ३१५ कोटी रूपये, यंत्रमाग संस्था उभारणीसाठी भांडवली अंशदानासाठी १७ कोटी तर कर्जासाठी २० कोटींची तरतूद केली आहे. एनसीडीसीअंतर्गत सूत गिरण्यांना कर्जासाठी राज्याच्या हिश्श्यासाठी २९९ कोटी ६३ लाख रूपये, टफ योजनेच्या दीर्घकालीन कर्जाच्या हिश्श्यासाठी ७४ कोटी ६३ लाख, सहकारी सूतगिरण्या भागभांडवलासाठी १५५ कोटी, अशी प्रामुख्याने भरीव तरतूद करण्यात आली असल्याकडे महाराष्ट्र वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांनी लक्ष वेधले.

### वस्त्रोद्योग धोरणावर भरवसा

यापूर्वीच्या वस्त्रोद्योग धोरणाची मुदत येत्या ३१ मार्चला संपणार असून त्याला तीन महिन्यांसाठी मुदतवाढ दिली आहे. पुढील पाच वर्षांसाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले जाणार असून विविध तरतुदी केल्या जाणार आहेत, असे यंत्रमागधारक जागृती संघटनेचे अध्यक्ष विनय महाजन यांनी सांगितले.

## गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरा

### नीती आयोगाचे आवाहन

**मुंबई :** गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरण्याचं आवाहन नीती आयोगानं केलं आहे. भारतात नव्या H3N2 इन्फ्लूएंझा विषाणूच्या संसर्गाने चिंता वाढवली आहे. देशात या संसर्गामुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. H3N2 इन्फ्लूएंझामुळे आरोग्य प्रशासन सतर्क झालं आहे. H3N2 इन्फ्लूएंझा विषाणूचा संसर्ग दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. सध्या देशात सर्दी, ताप आणि खोकला या आजाराच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. हा नवा व्हायरस असून खउचठनं हा विषाणू H3N2 इन्फ्लूएंझा व्हायरस असल्याची माहिती दिली आहे. सर्दी, ताप, खोकला आणि जुलाब ही H3N2 इन्फ्लूएंझा संसर्गाची लक्षणे आहेत.

H3N2 इन्फ्लूएंझाचा वाढता धोका पाहता केंद्रीय आरोग्य मंत्रालय अलर्टवर आहे. नीती आयोगाने कोविड टास्क फोर्स, केंद्रीय आरोग्य सचिव, राज्य आरोग्य अधिकाऱ्यांची बैठक आज महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्राने राज्यांना पत्र लिहीत कोविड प्रोटोकॉलचे पालन करा आणि मास्क वापरा, असा सल्ला दिला आहे. राज्यांनी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा सुनिश्चित करावा, रुग्णांचं बारकाईने निरीक्षण करावं, असं सांगितलं आहे.

सध्या कोरोना रुग्णांमध्ये घट झाली असली तरी नव्या विषाणूनं डोकं वर काढलं आहे. हवामान बदलामुळे अनेकांना सर्दी, ताप, खोकला या समस्यांना तोंड द्यावं लागतंय. सर्दी आणि सततचा खोकला यावर औषधही बेजार झाली आहेत. औषधं घेतल्यानंतरही बहुतेकांना खोकल्यापासून पूर्णपणे आराम मिळताना दिसत नाहीय. हा व्हायरल संसर्ग H3N2 इन्फ्लूएंझा विषाणूमुळे होत आहे. H3N2 इन्फ्लूएंझा विषाणू H1N1 इन्फ्लूएंझा विषाणूचा उपप्रकार म्हणजेच बदललेलं स्वरुप आहे.

---

# आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती घटनाबाह्य


## उच्च न्यायालयातील याचिकेत दावा

सुराज्य/मुंबई

**राज्य सरकारने आंतरधर्मीय विवाहांच्या प्रकारांमध्ये संबंधित महिलांचे रक्षण करण्याचा उद्देश दाखवत स्थापन केलेली आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती ही घटनाबाह्य आहे. आंतरधर्मीय विवाह करण्यास इच्छुक असणाऱ्यांचे खच्चीकरण करणे आणि प्रामुख्याने कथित लव्ह-जिहाद विवाहांना रोखण्यासाठी कायदा आणण्याची पूर्वतयारी म्हणून ही समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अशा जोडप्यांच्या अनेक मूलभूत हक्कांचे उल्लंघन होणार आहेफ असा दावा करत समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी सरकारच्या निर्णयाला याचिकेद्वारे आव्हान दिले आहे.**

श्रद्धा वालकरच्या अत्यंत घृणास्पद हत्येचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आंतरधर्मीय विवाह झालेल्या कुटुंबांतील महिलांचे रक्षण व्हावे, त्यांना त्यांच्या तक्रारी व व्यथा मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे आणि कुटुंबातील कलह मिटवण्यास सहाय्य मिळावे, या उद्देशाने राज्याच्या महिला व बालविकास विभागाने १३ डिसेंबर २०२२ रोजी शासनादेश (जीआर) काढत महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली ही समन्वय समिती स्थापन केली आहे.

सरकारचा जीआर हा मुळातच भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ (समानतेचा हक्क), अनुच्छेद १५ (भेदभाव करण्यास मज्जाव), अनुच्छेद २१ (खासगी आयुष्याचा हक्क अंतर्भूत असलेला जीवन जगण्याचा हक्क) व अनुच्छेद २५ (धर्म आचरणाचा हक्क) याअन्वये भारतीय नागरिकांना असलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा आहे. कारण सरकारच्या जीआरप्रमाणे कोणाच्याही सांगण्यावरून संबंधित जोडप्याच्या खासगी आयुष्यात ढवळाढवळ केली जाणार आहे. जेव्हा दोन प्रौढ व्यक्ती स्वत:च्या आवडी-निवडीप्रमाणे व आपल्या विवेक बुद्धीने जोडीदार निवडण्याचा निर्णय घेतात तेव्हा त्याला आडकाठी करण्याचा किंवा त्यात ढवळाढवळ करण्याचा कायद्याने कोणालाही अधिकार नसतो. संबंधित महिलेला कोणत्याही प्रकारचा त्रास होत असेल तर तिला दाद मागण्यासाठी राज्यघटना व कायद्यांमध्ये आधीच अनेक तरतुदी आहेत. कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत विविध मार्ग आहेत. त्यामुळे स्वत:च्या धर्माबाहेर जाऊन



विवाह करणाऱ्या महिलेचे रक्षण करण्याच्या कारणासाठी समिती हे घटनेतील तरतुदींशीच विसंगत आहे. शिवाय महिलेचा छळ केवळ आंतरधर्मीय विवाहांच्या प्रकारांतच होतो, असे गृहित धरून सरकारने हे पाऊल उचलले आहे. विशिष्ट धर्माला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करून सरकार सामाजिक सलोखाही बिघडवण्याचे काम करत आहे', असा आरोपही शेख यांनी ॲड. जीत गांधी यांच्यामार्फत या याचिकेत केला आहे. तसेच हा जीआर घटनाबाह्य ठरवून रद्दबातल करावा तसेच याचिका प्रलंबित असेपर्यंत या जीआरप्रमाणे कोणतीही कार्यवाही करण्यास सरकारला मनाई करावी, अशी विनंतीही याचिकेत आहे.

## औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी

**सुराज्य/औरंगाबाद:** औरंगाबादचे नामांतर छत्रपती संभाजीनगर केल्याच्या निषेधार्थ एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वात साखळी उपोषण करण्यात येत आहे. त्यांच्या



आंदोलनाविरोधात भाजपा-शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, जलील यांच्या आंदोलनावर आज शिंदे गटाचे नेते तथा आमदार संजय शिरसाट यांनीही जोरदार टीका केली. इम्तियाज जलील यांचं आंदोलन नाही तर बिर्याणी पार्टी आहे, असं ते म्हणाले. तसेच औरंगजेबाची कबर औरंगाबादमधून हटवा, अशी मागणीही त्यांनी केली. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.


# कोयत्याने वाहनांची तोडफोड

## दहा वाहनांचे नुकसान

सुराज्य/पुणे

**पिंपरी-चिंचवड शहरात पुन्हा एकदा वाहन तोडफोडीची घटना घडली आहे. अज्ञात तिघांनी कोयत्याने वाहनांची तोडफोड करत दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. शनिवारी पहाटे चारच्या सुमारास चिखली परिसरातील सरस्वती शाळेजवळ ८ ते १० वाहनांची तोडफोड करण्यात आली.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात तीन जणांनी चिखलीतील सरस्वती शाळेजवळ पार्क केलेल्या वाहनांना लक्ष करत वाहनांची तोडफोड केली. यात वाहनांच्या काचा फोडण्यात



आल्या असून, सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हातात कोयते घेऊन तिघांनी हुल्लडबाजी करत दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. काही महिने झाले वाहन तोडफोडीचे सत्र थांबलेले होते. परंतु, ते पुन्हा सुरू होते की काय? अशी शंका उपस्थित केली जात आहे. गेल्या तीन महिन्यांपासून शहरात शांतता नांदत होती. परंतु, पुन्हा तोडफोडीच्या घटनेने पोलिसांची डोकेदुखी वाढवली आहे.

# नामांतरविरोधी आंदोलनात औरंगजेबाचे छायाचित्र

सुराज्य/औरंगाबाद

**औरंगाबादचे नामांतर छत्रपती संभाजीनगर केल्याच्या निषेधार्थ 'एमआयएम'ने शनिवारी केलेल्या आंदोलनात औरंगजेबाचे छायाचित्र झळकल्याने खळबळ उडाली. खासदार इम्तियाज जलील यांनी मात्र नामांतरविरोधातील लढ्याला बदनाम करण्याच्या उद्देशानेच काही तरुणांनी औरंगजेबाचे छायाचित्र आंदोलनस्थळी आणल्याचे स्पष्टीकरण दिले.**

नामांतर संघर्ष समितीच्यावतीने शनिवारपासून साखळी आंदोलन सुरू करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने तरुण सहभागी झाले होते. 'आय लव्ह 'औरंगाबाद' असे फलक या आंदोलक तरुणांच्या हातात झळकत होते. मात्र, दुपारी अचानक काही तरुण



आंदोलनस्थळी आले आणि त्यांनी औरंगजेबाचे छायाचित्र झळकवले.

दरम्यान या घटनेची कुणकुण खासदार जलील यांना लागल्यानंतर आणि त्यावरून वाद उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी तातडीने स्पष्टीकरण देण्यासाठी भूमिका मांडली. औरंगाबादच्या नामांतराला उद्योग, सर्वसामान्य जनतेतून विरोध होत असून आपल्या आंदोलनाला बदनाम करण्याच्या उद्देशानेच काही तरुणांनी येथे औरंगजेबाचे छायाचित्र येथे प्रदर्शित केले. या घटनेशी एमआयएमचा कसलाही संबंध नसल्याचा खुलासा जलील यांनी केला.

## आठ लाखांची लाच! एपीआयला रंगेहाथ पकडले

**सुराज्य/कोल्हापूर :** फसवणुकीच्या गुन्ह्याप्रकरणी कारवाई न करण्यासाठी आठ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी कोल्हापूर येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश सिद्धाराम मात्रे (वय ३८) व पोलीस हवालदार रुपेश तुकाराम कुंभार (व ४१) यांना पहाटे अडीच वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगे हात पकडले.

प्रकरणातील तक्रारदार यांच्या आत्याच्या मुलाविरुद्ध कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यामध्ये आत्याच्या मुलास अटक करू नये यासाठी तक्रारदाराचे प्रयत्न सुरू होते. या कारवाईमध्ये अटक न करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांनी आठ लाख रुपयांची लाचेची मागणी केली होती.

# लोकशाहीच्या हत्येचा कुत्सित प्रयत्न : खरगे

सुराज्य/नवी दिल्ली

**नरेंद्र मोदी सरकार हे विरोधी पक्षांच्या विरोधात तपास यंत्रणांचा दुरुपयोग करतं आहे. लोकशाहीच्या हत्येचा हा कुत्सित प्रयत्न आहे, असं म्हणत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर टीका केली आहे.**

लालू प्रसाद यादव यांच्या घरावर, कार्यालयांवर त्यांच्याशी संबंधित लोकांवर ईडीने छापेमारी केली आहे. त्यानंतर हे वक्तव्य





मल्लिकार्जुन खरगेंनी केलं आहे.

राजदचे प्रमुख आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांच्याशी संबंधित सुमारे १५ ठिकाणी ईडीने छापेमारी केली. रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती. त्यानंतर आता मल्लिकार्जुन खरगे यांनी भाजपावर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. तुमचे खास दोस्त असलेल्यांची संपत्ती जेव्हा गगनाला गवसणी घालते तेव्हा त्यांची चौकशी तपास यंत्रणा का करत नाहीत? असाही टोला मल्लिकार्जुन खरगे यांनी लगावला आहे.

गौतम अदानी प्रकरणावरून त्यांनी मोदींवर ही टीका केली आहे. एवढंच नाही तर देशातले अनेक व्यापारी बँका बुडवून पळाले तेव्हा मोदी सरकारच्या या तपासयंत्रणा काय करत होत्या? असाही प्रश्न खरगे यांनी विचारला आहे.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त द्राक्ष महोत्सवाचे आयोजन

**सुराज्य/पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिरात द्राक्ष महोत्सव साजरा करण्यात आला. काळ्या आणि हिरव्या द्राक्षांनी मंदिरातील गाभारा व




सभामंडप सजला होता. नाशिक येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या शेतकऱ्यांनी पिकवलेल्या निर्यातक्षम व रसायनविरहित दोन हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली.

ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांसह सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे पदाधिकारीदेखील उपस्थित होते. ही द्राक्षे नंतर भाविक, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, ससून रुग्णालयात प्रसाद म्हणून दिली जाणार आहेत.

# दोन चिमुरड्यांचा विषबाधेने करुण अंत

**सुराज्य/नगर :** अहमदनगरमधील टाकळी काझी गावात तीन मुलांना लिंबू सरबत पिल्याने विषबाधा झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेत दोन चिमुरड्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शिवराज बापू म्हस्के (वय ४.५ वर्ष) आणि स्वराज बापू म्हस्के (वय १.५ वर्ष) अशी मृत्यू झालेल्या चिमुकल्यांची नावं आहेत. सार्थक भाऊसाहेब म्हस्के या १४ वर्षीय मुलावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. वडील बापू म्हस्के हे गवंडी काम करतात तर आई स्वप्नाली बापू म्हस्के या घर काम करतात. दोन्ही मुलं गेल्यानं आई-बापावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलांनी स्वत: लिंबू सरबत बनवलं होत. त्यानंतर त्यांना उलटीचा त्रास होऊ लागला आणि त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान, एका मुलाचा सकाळी तर एका मुलाचा सायंकाळी मृत्यू झाला. तर तिसऱ्या मुलावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.



## नाना पटोले यांच्या प्रदेशाध्यक्षपदावर गदा?

सुराज्य/नाशिक

नाशिक पदवीधर निवडणुकीत काँग्रेसमधील कलह शिगेला पोहोचला आहे. तांबे, थोरात आणि पटोले यांच्यातील वाद थेट दिल्ली हायकमांडपर्यंत पोहोचला. मात्र, यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात काँग्रेसमधील एका असंतुष्ट गटाने मोठी आघाडी उघडल्याची जोरदार चर्चा आहे. आता पुन्हा एकदा काँग्रेसमधील गटबाजी चव्हाट्यावर आली आहे.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात पक्षांतर्गत असंतोष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. पटोले यांच्या विरोधातील नाराज गट दिल्लीत पक्षाच्या नेत्यांची भेट घेणार आहेत. यामध्ये काँग्रेसचे दोन माजी खासदार, चार माजी आमदारांसह शिष्टमंडळ दिल्लीला गेले आहे. मराठवाड्यातील पटोले यांच्या विरोधातील असंतुष्ट गट काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि वेणुगोपाल यांची दिल्लीत भेट घेणार आहे. पटोले यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटवण्याची मागणी हा गट करणार असल्याची माहिती आहे.

# पुण्यात १७ पिस्तुल जप्त, ७ जणांना अटक

सुराज्य/पुणे

**पुण्यात कोयता गँगचा धुमाकूळ कुठेतरी आटोक्यात येत आहेत. शहरातील गुन्ह्यांना आळा घालत असताना एका कारवाईत पोलिसांना मोठं यश मिळालं आहे. मध्यप्रदेशातून विक्रीसाठी आणलेले १७ पिस्तुल पोलिसांनी जप्त केले आहेत. पिस्तुल विकणाऱ्या ७ सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट ६ चीही मोठी कारवाई मानली जात आहे. पहिल्या कारवाईचा धागा पकडत पिस्तुलचा धंदा करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी गजाआड केलं आहे.**





या प्रकरणी हनुमंत गोल्हार (२४), प्रदीप गायकवाड (२५), अरविंद पोटफोडे (३८), शुभम गरजे (२५), ऋषिकेश वाघ (२५), अमोल शिंदे (२५) असे अटक केलेल्या आरोपींची नाव आहे.

दुसऱ्या कारवाईत सुसगाव या ठिकाणी पोलिसांनी कारवाई करत साहिल चांदेरे (२१) याच्याकडून ४ पिस्तुलसह ९ जिवंत काडतुसं असा २,४९,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. गुन्हेगारांच्या बारीक हालचालींवर नजर ठेवण्यासाठी पोलिसांची पथकं तैनात करण्यात आली आहेत. युनिट ६चे पथक गस्तीवर असताना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली. पिस्तुल विक्री करणारे २ डीलर वाघोली येथील नाना श्री लॉजजवळ थांबले आहे. त्याच परिसरात त्यांचं वास्तव्य असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर त्या अनुषंगाने पोलिसांनी सापळा रचून २ जणांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून १ गावठी पिस्तुल आणि २ जिवंत काडतुसं जप्त करण्यात आले, अशी माहिती मिळाली आहे.

अधिक चौकशी केली असता त्यांच्याकडून पिस्तुल घेणाऱ्या तरुणांना देखील पोलिसांनी अटक केली. हे सगळे जण अहमदनगर जिल्ह्यातील आहेत. या आरोपींकडून १३ गावठी बनावटीच्या पिस्तुलासह ४ जिवंत काडतुसं तसेच एक चारचाकी वाहन, मोबाइल असा २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुण्यात गेल्या काही महिन्यांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. हातात कोयते घेऊन नाचवणे, केक कापणे आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांची ही मोठी कारवाई मानली जात आहे.

# हक्कभंग



स्वतंत्र भारताने संसदीय लोकशाही पध्दत स्वीकारली आहे. संसदीय लोकशाही पध्दतीची संपूर्ण संरचना भारतीय राज्यघटनेत दिलेली आहे. म्हणजेच संसदीय लोकशाहीमध्ये देशाचा संपूर्ण राज्यकारभार हा भारतीय राज्यघटनेनुसार चालतो. लोकशाहीमध्ये प्रत्यक्ष लोक देशाच्या किंवा राज्याच्या राज्यकारभारामध्ये सहभागी होऊन कामकाज पाहू शकत नाहीत. देशाचा राज्यकारभार पाहण्यासाठी लोक आपले प्रतिनिधी संसदेत आणि राज्याच्या विधिमंडळात पाठवतात. त्यासाठी लोक म्हणजे मतदार आपला प्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडून देतात. निवडून आलेले हे लोकांचे प्रतिनिधी संसदेत आणि राज्याच्या विधिमंडळात लोकांच्यावतीने कामकाज पाहतात. साहजिकच या लोकप्रतिनिधींना भारतीय राज्यघटनेने काही विशेषाधिकार दिलेले आहेत. या अधिकारानुसार लोकप्रतिनिधींच्या वक्तव्याला, वर्तनाला आणि विशिष्ट कृतीला राज्यघटनेने संरक्षण दिलेले आहे. या अधिकारांवर किंवा हक्कांवर बाधा आली तर त्या हक्कांना आणि अधिकारांना राज्यघटनेने सुरक्षा प्रदान केली आहे. त्यासाठी काही खास तरतुदी राज्यघटनेत करण्यात आला आहे. त्या तरतुदींचा वापर करून संबंधित लोकप्रतिनिधी आपल्या अधिकारांचे आणि हक्कांचे संरक्षण करतात. हे हक्क अबाधित ठेवण्यासाठी जी प्रक्रिया राज्यघटनेत सुचवण्यात आली आहे, त्या प्रक्रियेला हक्कभंगाचा प्रस्ताव असे म्हटले आहे.




## हक्कभंग म्हणजे काय?



संसद आणि राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना भारतीय राज्यघटनेने काही विशेषाधिकार दिलेले आहेत. याशिवाय एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संसदेने किंवा राज्य विधिमंडळाकडून विविध समित्या नेमल्या जातात. या समित्यांमध्येही संसदेचे किंवा राज्य विधिमंडळाचे सदस्य आणि अधिकारी वर्ग यांचा समावेश असतो. साहजिकच अशा समितीलाही ते विशेषाधिकार प्राप्त होतात. या विशेषाधिकारांवर बाधा येईल असे वक्तव्य किंवा वर्तन कोणालाही करता येत नाही. आमदार किंवा खासदार सभागृहात जे विचार मांडतात; त्यावर सभागृहाबाहेर टिका टिप्पणी करण्याचा अधिकार कोणालाही नाही. जर कोणी त्यापध्दतीचे वक्तव्य किंवा वर्तन करत असेल तर तो हक्कभंग होतो.

## राज्यघटनेतील तरतूद




भारतीय राज्यघटनेतील कलम १०५ नुसार संसद सदस्यांना म्हणजेच लोकसभा व राज्यसभेच्या खासदारांना आणि कलम १९४ नुसार राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना अर्थात विधानसभा आणि विधान परिषदेच्या आमदारांना विशेषाधिकार देण्यात आले आहेत. या विशेषाधिकारांचा भंग झाल्यानंतर संबंधित सदस्यांना वरील तरतुदीनुसार संबंधित सभागृहात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करता येतो.

## हस्तक्षेप किंवा अपील




उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाला या हक्कभंगाच्या शिक्षेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. शिवाय हक्कभंग प्रकरणात शिक्षा झाल्यानंतर त्याविरुद्ध अपील करण्याचा अधिकारही नाही. तसेच याप्रकरणात जामिनाची तरतूद नसल्यामुळे झालेली शिक्षा पूर्ण भोगावीच लागते.

## हक्कभंग प्रस्ताव मांडण्याचे प्रकार

१) विधिमंडळ सभासदाकडून तक्रार : जेव्हा आपल्या विशेषाधिकाराचा भंग झाला आहे, असे संबंधित विधिमंडळ सदस्याला वाटते, तेव्हा तो विधिमंडळाकडे त्यासंदर्भातील तक्रार करून हक्कभंगाचा प्रस्ताव आणू शकतो.

२) विधानसभा सचिवांचा अहवाल : एखाद्या घटनेत सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग होणारे वक्तव्य किंवा वर्तन घडले असेल तर विधानसभा सचिव त्यासंदर्भातील अहवाल सभागृहाला सादर करतात. त्यावरूनही हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जातो.

३) याचिका : ज्या सदस्याचा हक्कभंग झाला असेल तो सदस्य सभागृह प्रमुखांकडे याचिका दाखल करून हक्कभंगाचा प्रस्ताव आणू शकतो

४) सभागृह समितीचा अहवाल : एखाद्या घटनेत सभागृहाचा किंवा सभागृह सदस्याचा हक्कभंग झाला असल्याचा अहवाल संबंधित सभागृह समितीने सभागृहाकडे सादर केल्यानंतरही हक्कभंगाचा प्रस्ताव आणता येतो.

## हक्कभंग मांडण्याची प्रक्रिया

भाजप नेते हर्षवर्धन पाटील हे राज्याचे संसदीय कामकाज मंत्री होते. त्यांना संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी 'विधानगाथा'नावाचे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात हक्कभंग प्रस्तावाची प्रक्रिया विषध करण्यात आली आहे. या पुस्तकात हक्कभंग मांडण्याची प्रक्रिया सांगितलीय. ती प्रक्रिया पुढील प्रमाणे आहे.

- एकूण सदस्य संख्येपैकी १/१० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या प्रस्तावावर असाव्यात.
- अध्यक्षांनी विचारल्यानंतर किमान २९ सदस्यांनी हक्कभंग प्रस्तावाला उभे राहून पाठिंबा दर्शवला पाहिजे.
- हक्कभंगाची नोटीस अगोदर द्यावी.
- हक्कभंग प्रस्ताव कुणाविरुद्ध आहे आणि काय आहे? याची माहिती प्रस्ताव दाखल करण्यांनी द्यावी.
- हक्कभंग करणाऱ्याला विधिमंडळाकडून नोटीस पाठवली जाते. नोटिसीप्रमाणे हक्कभंग करणाऱ्याला सभागृहासमोर येणे बंधनकारक आहे.
- हक्कभंग प्रस्ताव विधिमंडळात मंजूर झाल्यास, हक्कभंगास कारणीभूत व्यक्तीला शिक्षा करण्याचा अधिकारही सभागृहाला आहे.
- समज देऊन सोडून देण्यापासून तुरुंगवास ठोठावण्यापर्यंतची योग्य ती शिक्षा संबंधिताला देता येते.

## शिक्षा

- समज देणे, ताकीद देणे, आरोपी आमदार असल्यास निलंबन किंवा हकालपट्टी करणे, दंड आकारणे, अटक करून तुरुंगवास किंवा सभागृहाला योग्य वाटेल ती शिक्षा करण्याची तरतूद आहे.

## हक्कभंग प्रस्तावाचे प्रकार

१) सभागृहाचा हक्कभंग
जेव्हा संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या सभागृहाचाच अवमान केला जातो किंवा सभागृहाच्या विशेषाधिकारांवर गदा येईल असे वक्तव्य किंवा वर्तन केले जाते; तेव्हा सभागृहाचा हक्कभंग होतो. अशावेळी सभागृहाकडूनच हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जातो.

२) सभागृह सदस्याचा हक्कभंग : जेव्हा संसद किंवा राज्य विधिमंडळातील एखाद्या सदस्याच्या विशेषाधिकारावर बाधा येते; तेव्हा संबंधित सदस्याचा हक्कभंग होतो; सदस्याकडून हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जातो.

## 'मासळी बाजार' लेखामुळे 'दैनिक प्रभात'वर हक्कभंग



स्वतंत्र महाराष्ट्राच्या सुरुवातीचा काळ. त्यावेळी यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते. विधिमंडळाचे अधिवेशन चालू होते. या अधिवेशनात अभूतपूर्व असा गोंधळ झाला. त्यावेळी दैनिक प्रभातचे संपादक होते वा.रा. कोठारी. त्यांनी या गोंधळावर त्यांच्या 'प्रभात' या दैनिकात 'मासळी बाजार' या शीर्षकाखाली त्या गोंधळाचे वार्तांकन केले. विधिमंडळाला 'मासळी बाजार' असे संबोधल्यामुळे एका आमदारांनी यासंदर्भात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे लेखी तक्रार केली. मुख्यमंत्र्यांनी ही तक्रार हक्कभंग समितीकडे दिली. शिवाय याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समितीही नेमली. या समितीने कोठारी यांच्या लेखामुळे सभागृहाचा हक्कभंग झाल्याचा अहवाल सभागृहाला सादर केला आणि कोठारी यांना शिक्षा करण्याची शिफारस केली. यावर चर्चा सुरू असताना एस.एम. जोशी यांनी प्रभातकार कोठारी यांनी सभागृहासमोर त्यांची बाजू मांडावी, अशी सूचना केली. त्यानुसार कोठारी यांना सभागृहासमोर हजर राहण्याचे समन्स काढले गेले. कोठारी सभागृहाच्या प्रेक्षागॅलरीत उभे करण्यात आले. त्यावेळी कोठारी यांनी तब्बल ४५ मिनिटे त्यांची बाजू मांडली. सभागृहातील गोंधळाला 'मासळी बाजार' संबोधणे कसे योग्य होते, हे त्यांनी सभागृहाला पटवून दिले. वृत्तपत्रातील लेखावरून संपादकावर हक्कभंग आणण्यापेक्षा आमदारांनी आत्मावलोकन करणे कितपत गरजेचे आहे, हे कोठारी यांनी मुद्देसूद आणि प्रभावीपणे मांडले. त्याचा परिणाम असा झाला की सभागृहाने प्रभातकार कोठारी यांना हक्कभंगाच्या प्रकरणातून बिनशर्त मुक्त केले.

## निवडणूक आयुक्तांना दोन दिवस तुरुंगवास



स्व. विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते. स्व. आर.आर. पाटील गृहमंत्री होते. त्यावेळी नंदलाल हे राज्याचे निवडणूक आयुक्त होते. तेव्हा राज्य सरकार आणि निवडणूक आयुक्त असा वाद निर्माण झाला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकाऱ्यांची निवड ही निवडणूक आयोगाकडून झाली पाहिजे, हे नंदलाल यांचे मत होते. त्याला राज्य सरकारचा विरोध होता. यावरून हा वाद पेटला होता. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना नंदलाल म्हणाले, 'मी विधिमंडळाच्या कार्यकक्षेत येत नाही आणि मी सभागृहाला जाणत नाही.' या विधानावरून विधिमंडळ श्रेष्ठ की निवडणूक आयोग? असा प्रश्न निर्माण झाला. याच प्रश्नावरून मार्च २००८ मध्ये सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वादळी चर्चा सुरू झाली. 'सभागृहाला जाणत नाही' हे नंदलाल यांचे विधान हक्कभंगाला पुरेसे होते. झालेही तसेच. सभागृहात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला गेला. सभागृहासमोर हजर राहण्यासाठी नंदलाल यांना समन्स पाठवण्यात आले. मात्र नंदलाल यांनी सरकारी समन्सला जुमानले नाही. 'मी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे मी फक्त केंद्रीय निवडणूक आयोगाचेच आदेश पाळतो. सभागृहाचा आदेश पाळणे माझ्यावर बंधनकारक नाही, मी विधिमंडळाला जबाबदार नाही', अशी ताठर भूमिका नंदलाल यांनी घेतली. साहजिकच सभागृहाने नंदलाल यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव बहुमताने मंजूर केला. नंदलाल यांना अटक करण्याचे आदेश सभागृहाने गृहमंत्रालयाला दिले.

आदेश मिळताच पोलिसांनी नंदलाल यांचे कार्यालय गाठले. पोलिसांनी पहिल्यांदा नंदलाल यांच्या कार्यालयातील टेलिफोनच्या वायरी कापल्या. त्यानंतर त्यांना अटक करण्यासाठी त्यांच्या केबिनमध्ये पोलीस घुसले. 'तुम्ही माझ्या कार्यालयात कोणाच्या परवानगीने आलात?' असा प्रश्न विचारत टेबलावरचा फोन उचलला. पण फोन बंद होता. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. पण नंदलाल पोलिसांच्या गाडीत बसण्यास तयार नव्हते. पण पोलीसही त्यांना त्यांच्या सरकारी गाडीत बसू देण्यास तयार नव्हते. बराचवेळ वाद सुरू होता. अखेर पोलिसांनी त्यांना पोलिसांच्या गाडीत बसवले. तेथून त्यांची रवानगी आर्थर रोड तुरुंगात करण्यात आली. त्याठिकाणी नंदलाल यांनी दोन दिवसांचा तुरुंगवास भोगला.

## मंत्र्यांच्या बायकांना डान्सबारमध्ये नाचवू म्हणणाऱ्या शेट्टीला तीन दिवसांची शिक्षा



आर. आर. पाटील गृहमंत्री होते. त्यांना डान्सबार संस्कृतीबद्दल प्रचंड चीड होती. डान्सबारमुळे तरूणपिढी नासली जात होती. त्यांचे कुटुंब उध्वस्त होत होती. डान्सबारच्या नादाला लागलेल्या तरूणपिढीमुळे घरादाराची राख रांगोळी होत होती. म्हणून आर. आर. पाटलांनी डान्सबार बंदीचा कायदा आणण्याचे ठरवले. त्यावेळी संसदीय कामकाज मंत्री होते हर्षवर्धन पाटील. आर.आर. आबांनी यासंदर्भात अभ्यास करून डान्सबार बंदीच्या कायद्याचा प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी हर्षवर्धन पाटील यांच्यावर सोपवली. हर्षवर्धन पाटलांनीही तात्काळ डान्सबार बंदी कायद्याचा मसुदा तयार केला. पुढे तो सभागृहापुढे ठेवून बहुमताने डान्सबार बंदीचा कायदा पास करण्यात आला. मात्र त्यावेळी पैशाने गबरगंड बनलेली डान्सबारचालकांची संघटना पेटून उठली. मनजितसिंग शेट्टी हे या संघटनेचे अध्यक्ष होते. त्यांनी डान्सबार बंदी कायद्याच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. अनेक प्रयत्न करूनही उच्च न्यायालयात सरकारचा डान्सबार बंदीचा कायदा टिकला नाही. निकाल सरकारच्या विरोधात गेला. महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले. पण सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवत राज्य सरकारला दणका दिला आणि डान्सबार सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. साहजिकच, न्यायालयीन लढा जिंकल्यामुळे डान्सबार संघटनेचे अध्यक्ष शेट्टी गुर्मीत होते. 'डान्सबार बंदीचा कायदा रद्द करून घेतला. आता मंत्र्यांच्या बायकांनाच डान्सबारमध्ये नाचवू' असे मस्तीखोर विधान करून वाद ओढवून घेतला. हे विधान महाराष्ट्राच्या अस्मितेला तडा देणारे होते. त्यातून लोकप्रतिनिधींचा अवमान झाला होता. म्हणून मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि संसदीय कामकाज मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी याप्रकरणी हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याचा निर्णय घेतला. हर्षवर्धन पाटील यांनी स्वत: हक्कभंगाचा प्रस्ताव तयार करून तो दाखल करण्यासाठी भाजपच्या आमदारांकडे दिला. दाखल झालेला प्रस्ताव हक्कभंग समितीचे अध्यक्ष चंद्रकांत छाजेड यांच्याकडे आला. त्यानंतर शेट्टीला समन्स पाठवून सभागृहासमोर बोलावण्यात आले. मात्र शेट्टी सभागृहात आलाच नाही. शेट्टीतर्फे त्यांचा वकील हजर राहिला. त्यानंतर सभागृहाने हक्कभंग प्रस्ताव मंजूर करून शेट्टी याला तीन दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली.


संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे















